सत्यमेव जयते

# अनुसूचित जाती कल्याण समिती

## २०१५-२०१६

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका, तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय, यांच्या सेवेतील अनुसूचित जाती प्रवर्गाचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा.....**

# आठवा अहवाल

**(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक ९ ऑगस्ट २०१७ रोजी सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई,
ऑगस्ट, २०१७.

# अनुसूचित जाती कल्याण समिती

## (२०१५-२०१६)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका, तसेच पोलीस अधीक्षक कार्यालय, यांच्या सेवेतील अनुसूचित जाती प्रवर्गाचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा.....**

# आठवा अहवाल

एचबी १४५०–१

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | प्रस्तावना . . . . . . | (सात) |
| १ | अहवाल . . . . . . | १ |
| | जिल्हा परिषद कोल्हापूर, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर महानगरपालिका व पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर. | |
| २ | **परिशिष्ट "एक"** . . . . . . | ४३ |
| | (कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडून समितीला प्राप्त झालेली माहिती) | |
| २ | **परिशिष्ट "दोन"** . . . . . . | ६७ |
| | (समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त) | |

**अनुसूचित जाती कल्याण समिति**

**(२०१५-२०१६)**

**समिती प्रमुख :**

(१) डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.

(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(५) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

(६) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.

(७) श्री. सुभाष साबणे, वि.स.स.

(८) डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स.

(९) प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स.

(१०) श्री. नरहरी झिरवाळ, वि.स.स.

(११) श्री. इम्तीयाज जलील सय्यद, वि.स.स.

(१२) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१३) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.

(१४) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.

(१५) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. सुनिल मयेकर, कक्ष अधिकारी

---

सन २०१५-२०१६ या वर्षाकरिता मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक १ मे २०१५ व दिनांक २१ मे २०१५ रोजी अनुसूचित जाती कल्याण समिती नामनिर्देशित केली आहे.

एचबी १४५०–१अ

## प्रस्तावना

मी, अनुसूचित जाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा आठवा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

समितीने कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, महानगरपालिका व पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर येथे प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना व विशेष घटक योजनांसंदर्भात माहिती जाणून घेण्याचे ठरविले व त्यानुसार उपरोक्त विभागाच्या संदर्भात तयार केलेल्या प्रश्नावलीबाबतची माहिती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मागविण्यात आली.

समितीने उपरोक्त प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे दिनांक ४ ते ६ मे, २०१६ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, महानगरपालिका व पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर येथे प्रत्यक्ष भेट देऊन तेथील संबधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

समितीस पुरविण्यात आलेली लेखी माहिती व प्रत्यक्ष भेटीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी समितीसमोर दिलेल्या साक्षीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक ८ मे २०१७ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. प्रत्यक्ष भेटीच्या वेळी व विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीचा सर्वंकष विचार करून समितीने आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केलेल्या आहेत. परिशिष्ट एक मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, महानगरपालिका व पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडून समितीला प्राप्त झालेली माहिती तसेच परिशिष्ट-दोन मध्ये समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त दिलेले आहे. समितीने दिनांक ४ ऑगस्ट २०१७ रोजी प्रारूप अहवालावर विचार करून तो संमत केला.

कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, कोल्हापूर महानगरपालिका व पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर यांच्या आस्थापनेवरील साक्षीच्या वेळी, प्रधान सचिव, गृह विभाग, प्रधान सचिव, महसूल विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, नगरविकास विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, सह व्यवस्थापकीय संचालक, पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर तसेच इतर संबंधित अधिकारी यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन जे सहकार्य केले, त्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ९ ऑगस्ट २०१७.

**डॉ. सुरेश खाडे,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जाती कल्याण समिती.

## अहवाल

**जिल्हा परिषद, कोल्हापूर :**

अनुसूचित जाती कल्याण समितीने दिनांक ४ मे २०१६ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांसमवेत जिल्हा परिषदेतील अनुसूचित जातीच्या अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत सविस्तर चर्चा केली.

समितीने जिल्हा परिषदेमध्ये अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेली वर्ग अ ते ड मधील तांत्रिक व अतांत्रिक पदे सरळसेवा भरतीद्वारे भरण्यासाठी अवलंबिण्यात येत असलेल्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती देण्याबाबत सूचित केले असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे सांगीतले की, समितीला दिलेल्या प्रश्नावलीमध्ये संगणकीय बाबीमुळे व टायपिंग मिस्टेकमुळे काही त्रुटी झाल्या होत्या. त्यामध्ये दुरुस्ती करून आपल्याला सुधारित बुकलेट देण्यात आलेले आहे. पहिल्या प्रश्नासंदर्भात म्हणजेच सरळसेवा भरती प्रक्रियेसंदर्भात मी समितीला असे सांगू इच्छितो की, जिल्हा परिषदेमधील गट 'अ' व गट 'ब' संवर्गातील पदांची भरती सरळसेवा प्रवेशाद्वारे शासनस्तरावरून राबविण्यात येते. जिल्हा परिषदेकडून गट 'क' व गट 'ड' वर्गातील पदे भरण्यात येतात. या संवर्गातील तांत्रिक व अतांत्रिक पदे महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जिल्हा सेवाप्रवेश नियम, १९६७ मधील तरतुदी व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या दुरुस्त्या, तसेच शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर २००७ व दिनांक २७ जून २००८ मधील तरतुदीनुसार, बिंदू नामावलीनुसार प्रवर्गनिहाय रिक्त पदे विचारात घेऊन शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विहित वेळापत्रकानुसार प्रवर्गनिहाय भरावयाची रिक्त पदांची सामाजिक व समांतर आरक्षणांनुसार सविस्तर जाहिरात जादा खप असलेल्या वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात येते. तद्नंतर विहित मुदतीत आलेले उमेदवारांचे अर्ज छाननी करून पात्र उमेदवारांची जिल्हा निवड समितीमार्फत लेखी परीक्षा घेऊन पदे भरली जातात. सन २०१५-२०१६ पासून शासन निर्णय दिनांक २१ एप्रिल २०१५ अन्वये उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतात. सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ मध्ये गट 'क' व गट 'ड' या दोन्ही संवर्गांच्या परीक्षा ९० टक्के लेखी व १० टक्के तोंडी या स्वरूपात घेऊन त्यामधून गुणानुक्रमे उमेदवारांची निवड व नियुक्ती केली जात होती. दिनांक ५ जून २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार गट 'क' मधील पद भरतीसाठी व दिनांक ५ ऑक्टोबर २०१५ च्या शासन निर्णयान्वये गट 'ड' मधील पद भरतीसाठी सन २०१४-२०१५ पासून मुलाखत पद्धत बंद करून १०० टक्के लेखी परीक्षा घेऊन गुणानुक्रमे अंतिम निवड करून नियुक्त्या दिल्या जातात.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढे असेही नमूद केले की, सरळसेवा भरती प्रक्रियेमध्ये तीन संवर्ग असे आहेत की, ज्या विभागामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमधून स्पर्धा परीक्षा घेतली जाते. त्यामध्ये

वरिष्ठ सहायक (प्रशासन) हे एक पद असून याकरिता एकूण मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे भरली जातात. सदरची विभागीय स्पर्धा परीक्षा विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्यामार्फत घेण्यात येते. तसेच ग्रामविकास अधिकारी यांची पदे ग्रामसेवकांमधून निवडीने भरण्यासाठी मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परीक्षा ग्रामविकास विभागाच्या दिनांक १६ जुलै १९९१ मधील शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार व ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या एकूण मंजूर पदांच्या २५ टक्केनुसार प्रवर्गनिहाय रिक्त असलेल्या पदांनुसार विभागीय आयुक्त पुणे यांच्यामार्फत घेण्यात येते. तसेच अंगणवाडी सेविकेतून पर्यवेक्षिका या पदाची भरती महिला व बालविकास विभागाकडील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी सेविकेमधून पर्यवेक्षिका निवडीने भरण्याकामी शासनाचे मागदर्शन मागण्यात आले होते. ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिनांक ४ एप्रिल २०१६ अन्वये कळविल्यानुसार पर्यवेक्षिका पद भरती करताना साप्रविच्या दिनांक ५ जून २०१४ च्या शासन निर्णयान्वये मुलाखती घेण्यात येऊ नये, असे कळविले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. ही सरळसेवा भरतीची कार्यपद्धती आहे.

समितीने वर्ग-३ ची भरती प्रक्रिया २०११ नंतर केली होती. त्यानंतर भरती प्रक्रिया केव्हा करण्यात आली. तसेच वर्ग-३ च्या स्पर्धा परीक्षा कोणकोणत्या पदांकरिता केव्हा घेण्यात आल्या होत्या. याचे रोष्टर तपासले आहे काय, असेल तर कोणत्या वर्षापर्यंत तपासले आहे? असे विचारले असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रोष्टर तपासले आहे. काही संवर्गाचे रोष्टर २०११ पर्यंत झालेले आहेत. काही संवर्गाचे रोष्टर २०१३ पर्यंत झालेले आहे. २०११ मध्ये तपासलेले रोष्टर पुन्हा तीन वर्षांनी म्हणजेच २०१४ साली तपासणे आवश्यक होते. सदरहू प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आहे, असे सांगितले.

समितीने मागासवर्ग कक्षाच्या अधिकाऱ्यांनी यासंदर्भातील माहिती द्यावी, अशी सूचना केली असता, सहाय्यक आयुक्त (मावक) यांनी कृषी विभागाचे रोष्टर २०११ मध्ये तपासले आहे. पशुसंवर्धन विभागाचे रोष्टर २०१४ मध्ये तपासले आहे. शिक्षण विभागाची तपासणी २०१३ मध्ये झालेली आहे. इतर सर्व विभागाची रोष्टर तपासणी बाकी आहे, असे सांगितले. त्यावर समितीने त्यामध्ये बॅकलॉग किंवा इतर काही रिमार्क्स दिलेले आहेत काय? अशी माहिती विचारली असता, सहाय्यक आयुक्तांनी काही ठिकाणी अतिरिक्त भरती झाली असेल तर त्रुटी काढून दिलेल्या आहेत. त्याबाबत जिल्हा परिषदेने यादी दिलेली असून त्यांनी खुलासादेखील केलेला आहे असे सांगितले.

समितीने दर तीन वर्षांनी रोष्टर तपासणे आवश्यक आहे तसेच रोष्टरसंबंधातील अडचणी दूर केल्या पाहिजेत आणि अनुशेष व इतर बाबी पूर्ण केल्या पाहिजे तसेच जिल्हा परिषदेत सन २०११ नंतर रोष्टर न तपासलेले किती विभाग आहेत? आपल्याकडे एकूण किती विभाग आहेत? अशी माहिती विचारली असता उप मुख्य कार्य अधिकाऱ्यांनी सांगीतले की, असे सहा विभाग आहेत त्यात सामान्य प्रशासन विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, ग्रामपंचायत विभाग, अर्थ विभाग, कृषी विभाग, बांधकाम विभाग,

सार्वजनिक आरोग्य विभाग या विभागांचे रोष्टर तपासले नाही. तसेच जिल्हापरिषदेमध्ये एकूण १३ विभाग आहेत, असे सांगितले. त्यावर समितीने असे सांगितले की, १३ विभागांपैकी ७ विभागांचे रोष्टर तपासले नाहीत, म्हणजेच ५० टक्केपेक्षा कमी विभागांचे रोष्टर तपासले नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना येथे येऊन दोनच दिवस झालेले आहेत. आम्ही वैयक्तिक प्रश्न विचारत नाही. समिती येणार असल्याबाबत एक महिना अगोदर जिल्हापरिषदेस कळविण्यात आले होते. या कालावधीमध्ये आपण संबंधित अधिकाऱ्यांकडून सर्व विषय समजून घेणे आवश्यक होते. जवळपास ५५ टक्के रोष्टर न तपासण्याची कारणे काय आहेत? सन २०११ नंतर मागासवर्ग कक्षाकडूनच रोष्टर तपासण्यास विलंब लागला, असे आपल्याला म्हणायचे आहे काय? अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्य अधिकाऱ्यांनी असे उधृत केले की, या संदर्भात आम्ही मागासवर्ग कक्षाकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. परंतु त्यांच्याकडे असलेले मनुष्यबळ, तसेच कार्यक्षेत्र व संवर्गाची संख्या मोठी आहे. त्यांनी काही जिल्ह्यांना प्रायोरिटी दिल्यामुळे आम्हाला तीन ते चार वेळा पुढील तारखा देण्यात आल्या होत्या. मागासवर्ग कक्षाकडून काही सूचना देण्यात येऊन काही त्रुटी काढण्यात आल्या होत्या. त्यामुळे पुढील तारखा मिळाल्या होत्या. त्रुटींची पूर्तता केली असून आता आम्ही अंतिम टप्प्यात आहोत.

समितीने अशी विचारणा केली की, सन २०११ मध्ये रोष्टर तपासलेले आहे. २०११ पर्यंत सर्व बॅकलॉग कंम्पलीट आहे, असे तुम्ही सांगितले. आता २०१६ हे वर्ष सुरू आहे. परंतु २०१५ पर्यंत तरी बॅकलॉग कंम्पलीट आहे काय? मागासवर्ग कक्षाने काढलेल्या त्रुटीमध्ये तुम्ही रोष्टरप्रमाणे एवढा बॅकलॉग भरला पाहिजे, असे दिले आहे. रोष्टर फायनल झाले नसेल, परंतु त्यांचे इन्स्ट्रक्शन आले असेल. त्या इन्स्ट्रक्शनचे पालन करून बॅकलॉग पूर्ण केला आहे काय? तुम्ही मघाशी बोलताना मागासवर्ग कक्षावर क्लेम केला. त्यांच्याकडे रोष्टर पाठविले असून त्यांच्याकडून विलंब होत असल्याचे सांगितले. प्रत्येकवेळी फॉरमेटमध्ये प्रस्ताव पाठविला पाहिजे. प्रस्ताव परफेक्ट न पाठविल्यास त्यामध्ये त्रुटी काढल्या जातील व तो परत येईल, हे सहाजिकच आहे. पंरतु तुम्ही त्यांच्यावरच क्लेम करीत आहात असे विदित केले असता उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी यामध्ये विलंब झालेला असून त्याबाबत त्यांना माफ करावे, अशी समितीला विनंती केली. तसेच समितीने यामध्ये चूक झाल्याचे तुम्ही मान्य करीत आहात किंवा कसे? आपण रोष्टर तपासून घेतले नाही, हा मोठा फॉल्ट आहे. याची वेगवेगळी कारणे असतील. परंतु ती कारणे तुमच्या प्रशासनाची असून बाहेरील एजंसीची नाहीत हे आपल्याला मान्य करावे लागेल. सन २०१४ पर्यंतचे रोष्टर किती कालावधीमध्ये तपासून घेण्यात येईल अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ३१ जुलै २०१६ पर्यंत सर्व संवर्गातील रोष्टर तपासून घेण्यात येईल असे समितीला आश्वासन दिले. समितीने या संदर्भात सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांनी मदत करावी व त्यांनी दिलेली तारीख फॉलो करावी. रोष्टर तपासून पूर्ण झाल्यानंतर मागासवर्ग कक्षाने व जिल्हा परिषदेने समितीला कळवावे, अशी सूचना केली.

समितीने सहायक आयुक्तांनी देखील ही तारीख नोंद करून घ्यावी व या संदर्भात जिल्हा परिषदेला योग्य ते सहकार्य करावे. समितीला मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भात अहवाल सादर करावा. दिनांक ३१ जुलै २०१६ पर्यंत रोष्टर न तपासल्यास समितीकडून कारवाई केली जाईल, तसेच या संदर्भात सचिवांची देखील साक्ष घेण्यात येईल, असे विदित केले.

समितीने जिल्हा परिषदेच्या विविध विभागांमध्ये तांत्रिक/अतांत्रिक स्वरूपाची वर्ग अ ते ड मधील एकूण किती पदे मंजूर आहेत व उक्त मंजूर पदांपैकी एकूण किती पदे अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेली आहेत? त्यापैकी किती पदे प्रत्यक्षात भरण्यात आलेली आहेत व अद्याप अनुशेषाची किती पदे रिक्त आहेत? त्याची कारणे काय आहेत व सदर रिक्त पदे भरण्यासाठी आतापर्यंत कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत? अशी विचारणा केली असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हापरिषदेमध्ये एकूण ११ हजार ७३ तांत्रिक पदे आहेत. अतांत्रिक पदे १४३७, वर्ग ४ ची ८८७ अशी एकूण १३ हजार ३९७ पदे आहेत. त्यापैकी सरळसेवेची ११ हजार ५२८ आणि पदोन्नतीची १ हजार ८६९ पदे आहेत. यापैकी अनुसूचित जातीच्या उमेदवारांकरिता १ हजार ७४६ पदे आरक्षित आहेत. त्यापैकी अनुसूचित जातीचे १ हजार ५९३ कर्मचारी कार्यरत आहेत तर १५९ पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमध्ये सरळसेवेने भरावयाची ११६ पदे आणि पदोन्नतीची ४३ पदे आहेत. प्राथमिक शिक्षकांची ७९ पदे कमी दिसत आहेत. १४९ पदे इतर संवर्गातील अतिरिक्त आहेत. आपल्याकडे आरटीई लागू झाल्यानंतर संच मान्यता झाली त्यानुसार आमच्याकडे शिक्षकांची संख्या कमी झाली. आम्ही पूर्वी भरलेली शिक्षकांची १४९ पदे अतिरिक्त झाली. जी अतिरिक्त झालेली पदे आहेत ती इतर संवर्गातील आहेत. आपणास मंजूर पदांपेक्षा जास्त पदे भरता येत नाहीत. शिक्षक संवर्गातील अनुसूचित जातीची ७९ पदे रिक्त अशी माहिती दिली.

समितीने नियमाप्रमाणे अनुसूचित जातीच्या उमेदवारांची १३% पदे भरली पाहिजेत याबाबतची सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केंद्र प्रमुखाची १५ पदे, वाहनचालकाची १२ पदे, आरोग्य सेवकाची (महिला) १० पदे सोडली तर इतर संवर्गातील अनुसूचित जातीची दोन-तीन पदे भरावयाची आहेत. वित्त विभागाच्या दिनांक २ जून २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार पद भरतीवर निर्बंध घालण्यात आलेले आहेत. काही संवर्गामध्ये ७५ टक्के भरती करण्यास सांगितले आहे. तर काही संवर्गामध्ये मंजूर पदांच्या ५० टक्के पदे भरण्यास सांगितले आहे. ऑक्टोबर, २०१५ मध्ये जिल्हा निवड समितीची बैठक झाली, त्यामध्ये असा निर्णय घेण्यात आला की, जी काही पदे भरावयाची आहेत त्यामध्ये मागासवर्गीयांची पदे प्राधान्याने भरण्यात यावीत, त्याप्रमाणे पदे भरलेली आहेत, अशी माहिती दिली.

समितीने अशी विचारणा केली की, आपण सांगितल्याप्रमाणे, एकूण १५९ पदे रिक्त आहेत, ही पदे कोणकोणत्या संवर्गातील आहेत त्याची माहिती द्यावी तसेच वैद्यकीय अधिकारी वर्ग ३ ची एकूण किती पदे मंजूर आहेत व त्यापैकी अनुसूचित जातीच्या उमेदवारांकरिता किती पदे राखीव आहेत? यावर उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांची वर्ग ३ ची ३ पदे, आरोग्य सेवक ५ पदे, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक ४ पदे, पशुधन पर्यवेक्षक २, कनिष्ठ सहायक १, वरिष्ठ सहायक (लेखा)-१, पर्यवेक्षिका-४, विस्तार अधिकारी-१,आरोग्य सेवक (महिला) १०, प्राथमिक शिक्षक ७९, सहायक शिक्षक ३, ग्रामसेवक ३ अशी सरळसेवेची ११६ पदे व पदोन्नतीची ४३ पदे अशी एकूण १५९ पदे रिक्त आहेत, अशी माहिती दिली. त्यावर समितीने वैद्यकीय अधिकाऱ्यांची वर्ग ३ ची किती पदे मंजूर आहेत व त्यापैकी अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी किती पदे राखीव आहेत अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या, शासन निर्णय, दिनांक २८ मार्च २०१२ नुसार वैद्यकीय अधिकारी वर्ग ३ ची पदे शासनस्तरावरुन भरण्यात येतात. प्रत्येक संवर्गनिहाय सविस्तर माहिती नवीन पुस्तकातील पृष्ठ क्रमांक १२ व १३ वर दिलेली आहे. वैद्यकीय अधिकारी वर्ग ३ ची ५ पदे अनुसूचित जातीच्या उमेदवारांकरिता आरक्षित आहेत. त्यापैकी ३ पदे रिक्त आहेत. ही पदे शासनाकडून भरण्यात येतात. आरोग्य सेवकाचे वर्ग ३ चे १ पद रिक्त आहे. सदरहू पद दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी पदोन्नतीमुळे रिक्त झाले आहे. आरोग्य सेवकाची (१० टक्के) ४ पदे रिक्त आहेत. सदरहू पदे सह संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचेमार्फत भरण्यात येतात, अशी माहिती दिली.

समितीने आरोग्य सेवकाचे १ रिक्त पद कधी भरण्यात येणार आहे, अशी विचारणा केली असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर पद एक महिन्याच्या आत भरण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे समितीस आश्वासित केले. समितीने जिल्हा परिषदेमध्ये ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी तसेच इतर विविध विभागातील विस्तार अधिकाऱ्यांची एकूण किती पदे मंजूर आहेत व त्यापैकी किती पदे अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव आहेत तसेच राखीव पदांपैकी प्रत्यक्षात किती पदे भरण्यात आली आहेत व अद्याप किती पदे रिक्त आहेत व सदर रिक्त पदे भरण्यासाठी आतापर्यंत काय प्रयत्न करण्यात आलेले आहेत? अशी विचारणा केली असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेमध्ये ग्रामसेवकांची एकूण ७१० पदे मंजूर आहेत. त्यापैकी अनुसूचित जातीची १३ टक्केप्रमाणे ९२ पदे आवश्यक असून आज रोजी ८९ पदे भरलेली आहेत व ३ पदे रिक्त आहेत. ३ पदांपैकी २ पदांबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत. येत्या ८ दिवसांमध्ये ते कर्मचारी रुजू होतील. उर्वरित १ पद माजी सैनिकातून भरावयाचे असून माजी सैनिक उमेदवार मिळत नसल्यामुळे हे पद रिक्त आहे. सरळसेवा भरती करीत असताना किमान ४५ टक्के गुण असलेल्या उमेदवाराची निवड केली जाते. असा माजी सैनिक उमेदवार मिळत नाही. या संदर्भात शासन निर्णय आहे की, माजी सैनिकांचा अनुशेष ३ वर्षे भरता येतो. ३ वर्षांत पद भरले गेले नसल्यास ते पद खुल्या प्रवर्गात कनव्हर्ट करता येते. आता २ वर्षे झाली आहेत.

ग्रामविकास अधिकारी पदाची एकूण १९३ पदे मंजूर आहेत त्यापैकी १४५ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. यापैकी १९ पदे अनुसूचित जातीसाठी राखीव आहेत. सर्व पदे भरलेली असून यामध्ये कोणताही अनुशेष नाही. तसेच एकूण १९३ पदांपैकी ४८ पदे स्पर्धा परिक्षेतून भरावयाची आहेत. त्यामध्ये अनुसूचित जातीची ६ पदे आहेत. ही ६ पदे भरलेली आहेत. विस्तार अधिकारी पदाची ४२ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ७५ टक्केप्रमाणे पदोन्नतीची ३२ पदे भरावयाची असून अनुसूचित जातीची ४ पदे राखीव येतात. ही ४ पदे भरलेली आहेत. कोणताही अनुशेष नाही. विस्तार अधिकारी पंचायतमध्ये सरळसेवेसाठी १० पदे मंजूर असून १ पद अनुसूचित जातीसाठी राखीव असून ते पद भरलेले आहे. कोणताही अनुशेष शिल्लक नाही. विस्तार अधिकारी, कृषी या संवर्गात एकूण मंजूर ३२ पदे असून पदोन्नतीची १६ पदे आहेत. यामध्ये अनुसूचित जातीची २ पदे येतात. सदरहू २ पदे भरलेली असून कोणताही अनुशेष नाही. विस्तार अधिकारी, शिक्षण (श्रेणी २) या संवर्गामध्ये ४९ पदे मंजूर असून पदोन्नतीची १२ पदे आहेत. त्यातील २ पदे रिक्त आहेत. विस्तार अधिकारी (श्रेणी २) या पदाबाबत श्रेणी-३ मधून पदोन्नती दिली जाते परंतु श्रेणी ३ मध्ये सद्या पात्र उमेदवार नाही. श्रेणी ३ मध्ये विस्तार अधिकारी, शिक्षण या पदावर रिक्रुटमेंट रुल्सनुसार किमान ३ वर्षे सेवा करणे आवश्यक आहे. विस्तार अधिकारी, शिक्षण, श्रेणी २ मध्ये सरळसेवेमध्ये ३७ पदे कार्यरत आहेत. यामध्ये अनुसूचित जातीची ५ पदे येत असून सदरहू पदे भरलेली आहेत. विस्तार अधिकारी, शिक्षण (श्रेणी ३) मध्ये १९ पदे मंजूर असून अनुसूचित जातीची ३ पदे येतात व ही ३ पदे भरलेली आहेत. विस्तार अधिकारी (पुरुष), आरोग्य विभाग यामध्ये २३ पदे मंजूर असून पदोन्नतीमध्ये ११ पदे येतात. या ११ पदांपैकी २ पदे अनुसूचित जातीची असून ती रिक्त आहेत. पूर्वी आरोग्य विभागातील विस्तार अधिकारी पुरुष संवर्गातून सर्व पदे भरली जात होती. परंतु शासन अधिसूचना, दिनांक ५ डिसेंबर २०१२ नुसार पुरुषांचे प्रमाण कमी केले म्हणजेच ६७ टक्के करण्यात आले आणि आरोग्य सहायक महिलांसाठी पदोन्नतीची ३३ टक्के पदे उपलब्ध झाली. परंतु २०१२ पूर्वीचीच जादा पदे कार्यरत असल्यामुळे एकूण मंजूर पदांना पदोन्नती देता येत नसल्यामुळे ती पदे रिक्त दिसत आहेत.

समितीने जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांची किती पदे मंजूर आहेत, त्यापैकी अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे किती आहेत, उक्त राखीव पदांपैकी किती पदे भरण्यात आलेली आहेत व उर्वरित पदे न भरण्याची कारणे काय आहेत तसेच रिक्त असलेल्या पदांची सद्य:स्थिती काय आहे? अशी विचारणा केली असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राथमिक शिक्षक संवर्गामध्ये ८०९६ पदे मंजूर आहेत. त्यापैकी अनुसूचित जातीसाठी १०५२ पदे राखीव आहेत. त्यापैकी ९७३ पदे भरलेली आहेत. ७९ पदे रिक्त आहेत. १४९ शिक्षकांची पदे अतिरिक्त आहेत, असे सांगितले.

समितीने कोल्हापूर जिल्ह्यात किती खाजगी शाळा व एकूण किती संस्था कार्यरत आहेत, त्या शाळांमध्ये अनुशेष भरला किंवा कसे याची माहिती समितीला सादर करावी, असे सांगितले असता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणत्या शाळांनी आरक्षणाचे पालन केलेले नाही याची माहिती समितीला नंतर सादर करतो, असे आश्वासित केले.

समितीने किती खाजगी संस्थांच्या शाळांतील अनुशेष शिल्लक आहे? समितीने खाजगी अनुदानित शाळांतील अनुशेष सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांचेकडून तपासून घ्यावा. शिक्षणाधिकारी यांनी सदरहू अनुशेष भरण्यासाठी संबंधित शाळांना एक महिन्याचा कालावधी द्यावा व त्या कालावधीत अनुशेष भरला नाही तर त्या शाळांचे अनुदान थांबविण्यात यावे अशी समिती शिफारस करीत आहे. खाजगी संस्था जिल्हापरिषदेतील अतिरिक्त शिक्षकांना सामावून घेत नाहीत. आपल्याकडे अतिरिक्त शिक्षक आहेत, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात आले काय, ज्या शाळांमध्ये कमी शिक्षक असतील तेथे नियोजन केले काय, आपल्याकडे अनुसूचित जातीच्या उमेदवारांचा अनुशेष शिल्लक आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता, शिक्षणाधिकारी यांनी सन २०१२ मध्ये खाजगी शाळांमध्ये शिक्षकांची भरती करू नये, असा शासन निर्णय आहे. जोपर्यंत जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होत नाही तोपर्यंत नवीन शिक्षकांची भरती करू नये. जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांची भरती करण्यात येते त्याचे नियुक्ती प्राधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी असतात आणि खाजगी शाळांतील शिक्षकांची भरती करण्यात येते त्याचे नियुक्ती प्राधिकारी त्या संस्थेचे अध्यक्ष असतात, असे सांगितले.

समितीने जिल्हापरिषदेच्या शाळांतील अतिरिक्त शिक्षकांना खाजगी शाळेत सामावून घेण्यात येते काय? खाजगी शाळांमध्ये कोणकोणत्या पदांचा अनुशेष आहे याची माहिती मागासवर्ग कक्षाकडून तपासून घ्यावी आणि त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, अशी सूचना केली असता मुख्य कार्य अधिकाऱ्यांनी माहिती प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल, असे समितीस आश्वासित केले.

समितीने जिल्हापरिषदेंतर्गत मुलांची आणि मुलींची किती वसतिगृहे आहेत? यापैकी शासकीय इमारतीमध्ये किती वसतिगृहे आहेत? जी वसतिगृहे खाजगी इमारतीमध्ये आहेत अशी वसतिगृहे शासकीय इमारतींमध्ये समाविष्ट करण्याबाबत प्रस्ताव दिलेला आहे काय? असे विचारले असता, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी जिल्हापरिषद अंतर्गत एकूण ४५ अनुदानित वसतिगृहे असून त्यांपैकी ३७ मुलांची तर ८ मुलींची वसतिगृहे आहेत. ही वसतिगृहे खाजगी इमारतींमध्ये आहेत. आपणास त्या इमारतीचे भाडे द्यावे लागते. सहायक आयुक्त, समाजकल्याण यांचेकडे हा विषय आहे. ते या संदर्भात सविस्तर माहिती देऊ शकतील, असे सांगितले असता, सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी १६ वसतिगृहे आहेत त्यांपैकी १० मुलांची तर ६ मुलींची शासकीय वसतिगृहे आहेत. ८ वसतिगृहे शासकीय इमारतीमध्ये आहेत तर ८ वसतिगृहे भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयास तीन वसतिगृहांचा प्रस्ताव दिलेला आहे, असे

सांगीतले. तसेच गारगोटी येथे दोन वसतिगृहासाठी जागा मिळाली आहे. जयसिंगपूर येथे मुलींच्या वसतिगृहासाठी जागा मिळालेली आहे. त्याचा आराखडा शासनास सादर केलेला आहे. चंदगड येथे शासकीय वसतिगृहासाठी जागा उपलब्ध नाही. तहसीलदारांना पत्र दिलेले आहे. चंदगड हा डोंगराळ भाग आहे. आजरा येथे वसतिगृहाचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे, असे सांगितले.

समितीने सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४-२०१५ या प्रत्येक वर्षात जिल्हापरिषदेला किती सेस फंड उपलब्ध झाला व तो फंड खर्ची पडला किंवा कसे, सदरहू फंड खर्च झाला असेल तर कोणकोणत्या गावामध्ये कोणकोणत्या कामावर खर्च झाला, यासंदर्भातील नोट तयार केली आहे काय आणि कामांची सद्यःस्थिती काय आहे? अशी विचारणा केली असता जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी सन २०१२-२०१३ मध्ये १ कोटी ३६ लाख रुपये सेस फंडाची रक्कम मिळाली होती. त्यापैकी १ कोटी २३ लाख रुपये खर्च झाले आहेत. यातून समाजमंदीरामध्ये साहित्य पुरविणे ही योजना होती. तसेच दुसरी योजना राजर्षी छत्रपती शाहू महाराज घरकूल योजना होती. त्यानंतर समाज मंदीराचे बांधकाम व दुरुस्तीची कामे करण्यात आली, अशी माहिती दिली.

समितीने सन २०१२ ते २०१५ या कालावधीतील निधी शिल्लक आहे काय? सदरचा निधी शिल्लक रहाण्याचे कारण काय आहे. शिष्यवृत्ती पासून एकही विद्यार्थी वंचित राहिला नाही काय? प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापकांनी शाळेतील सर्व लाभार्थी मुलांचे फॉर्म भरले किंवा कसे याबाबत रिपोर्ट घेतला होता किंवा कसे व त्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली की नाही याबाबत रिपोर्ट घेतला होता काय? असे विचारले असता जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी शिष्यवृत्तीचे १ कोटी ३९ लाख रुपये शिल्लक राहिलेले आहेत. ऑन लाईन अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा केलेली आहे. तथापि, आपल्याला याकरिता २ कोटी रुपयापर्यंत निधी आवश्यक असतो. परंतु मागील वर्षी जास्त निधी प्राप्त झाला होता, म्हणजेच ३ कोटी रुपये प्राप्त झाले होते. शाळेच्या मुख्यध्यापकामार्फत ऑनलाईन फॉर्म भरले जातात. फॉर्म भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यात आलेली आहे. प्रत्येक तालुक्यातील मुख्याध्यापकांची आढावा बैठक घेऊन तसा अहवाल घेत असतो. सद्याच्या प्रकियेमध्ये ऑनलाईन फॉर्म भरले जातात. फॉर्म भरल्यानंतर जिल्हा कार्यालयाला सादर केले जातात. किती विद्यार्थ्यांनी फॉर्म भरले याची माहिती घेतली जाते. आपल्याकडे किती विद्यार्थी संख्या आहे, याची देखील त्यांना माहिती दिली जाते व अजून किती ऑन लाईन फॉर्म भरणे बाकी आहे, याचीही त्यांना माहिती दिली जाते असे सांगितले.

समितीने २०१४-२०१५ मध्ये सावित्रीबाई शिष्यवृत्ती योजनेचे ३ कोटी ११ लाख ४० हजार रुपये प्राप्त झाले होते, त्यापैकी १ कोटी ७१ लाख ५३ हजार ८०० रुपये खर्च झाले. यामध्ये १ कोटी रुपये जास्त आल्याचे आपले म्हणणे आहे. मागील वेळेस २५ हजार लाभार्थी होते व १ कोटी ९० लाख रुपयांपैकी सर्व निधी खर्च झाला. आताही २५ हजार लाभार्थी आहेत, परंतु निधी कमी खर्च झाला, याचे कारण काय आहे

व राज्य शासनाचा निधी केंद्र शासनाच्या योजनेमध्ये खर्च केला काय? सन २०१४ पर्यंतच्या सर्व लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे काय? अशी विचारणा केली असता जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांनी सावित्रीबाई फुले योजनेसाठी लाभार्थ्यांना वर्षाला १ हजार रुपये दिले जात होते. परंतु या मुलींना त्या वर्षी या योजनेचा लाभ न देता मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात आला. या योजनेसाठी वर्षाला ३ हजार ५०० रुपये लाभ देत होतो. त्यामुळे सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेचा निधी शिल्लक राहीला. राज्य शासनाचा निधी केंद्र शासनाच्या योजनेकरिता खर्च केला नाही. तसेच फॉर्म भरलेल्या सर्व लाभार्थ्यांना लाभ मिळालेला आहे अशी माहिती दिली.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

समितीने सन २०१४-२०१५ या कालावधीत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या दलित वस्ती सुधार योजनेचा निधी शासनाकडून प्राप्त न होण्याची कारणे काय आहेत? याबाबत शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१४-१५ मध्ये ९४६ लक्ष रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी ८६० लक्ष रुपये प्राप्त झाले होते. २१२ मंजूर कामांची संख्या होती व त्या कामांची रक्कम ९४६ लक्ष रुपये इतकी होती. सन २०१५-१६ मध्ये १४०० लक्ष रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी ९५२ लक्ष रुपये प्राप्त झाले होते. मंजूर कामांची संख्या २९९ होती व त्या कामांची रक्कम १४०० लक्ष रुपये इतकी होती. सन २०१६-१७ मध्ये १५०० लक्ष रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी १५०० लक्ष रुपये प्राप्त झाले होते. परंतु मागील २ वर्षांच्या काळात शासनाकडून ४४७.१२ लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झाला नव्हता. सदर निधीचे दायित्व वगळून उर्वरित रकमेत २०२ कामे मंजूर करण्यात आली. सन २०१६-१७ मध्ये कोणतेही दायित्व शिल्लक नाही. अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार जेवढी रक्कम प्राप्त झाली तेवढ्या तुलनेत कामे मंजूर केली आहेत. सध्या शासनाकडून कोणतीही येणी शिल्लक नाही, अशी माहिती दिली. यावर समितीने अशी विचारणा केली की, समितीने लाभार्थ्यांना घरकूल योजनांचा लाभ देण्यासाठी ग्रामसभेमध्ये लाभार्थ्यांची नावे निश्चित केली जातात. त्यानंतर त्या लाभार्थ्यांची नावे पंचायत समिती, जिल्हा परिषदेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविली जातात. गावामध्ये वेगळी परिस्थिती असते. त्यांची संख्या अल्प प्रमाणात असल्यामुळे अशा योजनांमध्ये कोणाची नावे निश्चित करायची या संबंधी ठराविक लोक निर्णय घेत असतात. यात गरजू लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ न मिळाल्यामुळे ते वंचित राहतात, त्यांना डावलले जाते. या संदर्भात आपण लक्ष दिल्यास ज्या गरजू लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ मिळालेला नाही, त्यांना घरकुले मिळण्यास मदत होऊ शकेल. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मदतीने सदर योजनेच्या अनुषंगाने किती मागणी करण्यात आली? ठरावानुसार कार्यवाही केली जाते. परंतु ठरावानुसार कार्यवाही केल्यास खरे व गरजू

लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहतात व इतरांना त्या योजनेचा लाभ मिळाल्याचे समितीच्या निदर्शनास आले व त्या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यावर ग्रामविकास सचिवानी असे सांगीतले की, सन २०११ मध्ये शासनाकडून जनगणना करण्यात आली होती. त्यात प्रत्येक घराची गणना करण्यात आली होती. त्यात कोणत्या व्यक्तीकडे घर आहे का, असल्यास ते कशा प्रकारचे व किती आकाराचे आहे यासंबंधी सविस्तरपणे उल्लेख करण्यात आला होता. केंद्र शासनाने या संदर्भात ग्रामसभेला अधिकार देत असताना त्यांच्यावर काही बंधने सुद्धा टाकली. केंद्र शासनाने एसईसीच्या यादीवर संगणकाच्या माध्यमातून फिल्टर लावला व त्यानुसार त्यांनी जनगणनेप्रमाणे संबंधित लोक पात्र असल्यासंबंधी एक यादी पाठविली. सदर यादीत पारदर्शकता ठेऊन त्यात काही चूक झाली आहे किंवा नाही यासंबंधी ग्रामसभेने सांगावे. परंतु एसईसी यादीत माझे नाव वर असेल तर मला बायपास करून दुसऱ्यांना लाभ देण्याचा अधिकार ग्रामसभेला नाही. यामुळे पंतप्रधान घरकूल आवास योजनेच्या संदर्भात तक्रारी आल्याचे आपल्याला दिसून येत नाही. त्यात ग्रामसभेनी ६०० नावे समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे, असे सांगितले.

समितीने पंतप्रधान घरकूल आवास योजनेच्या संदर्भात ही बाब बरोबर आहे. परंतु समितीने कोल्हापूर जिल्हामध्ये दौरा करण्यापूर्वीच्या काही गोष्टी घडलेल्या आहेत. पंतप्रधान घरकूल आवास योजना सुरू असल्यामुळे ते प्लॅनमध्ये आहे काय अशी विचारणा केली असता, ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी एसईसीचे बंधन आहे. परंतु त्या संदर्भात रमाई घरकूल आवास योजनेमध्ये पालन केले जात नाही कारण ती स्टेट स्कीम आहे, असे सांगितले.

समितीने ग्रामसभेकडून मंजूर झालेली प्रकरणे आणि दलित वस्त्यांकडून किती घरकुलांची मागणी करण्यात आली? त्या लोकांना घरकुले मिळण्यासाठी कशी कार्यवाही करता येईल त्यासाठी त्यांचा पंतप्रधान घरकूल आवास योजनेत समावेश करता येईल का? आतापर्यंत ठरावामध्ये ज्या लाभार्थ्यांची नावे होती त्यांना घरकुले देण्यात आली. परंतु त्यातून वंचित राहिलेल्या लोकांना तातडीने घरकुले देण्यासाठी शासनाने विचार करणे गरजेचे आहे. माननीय पंतप्रधानांच्या धोरणानुसार सर्व लोकांना घरे मिळाली पाहिजेत. या सर्व गोष्टींचा विचार करून गरजू लाभार्थ्यांना घरकुले देण्याच्या संदर्भात किती अनुशेष राहिला आहे याचा विचार करून त्याकरिता कोणती कार्यवाही करणार आहात? अशी विचारणा केली असता, ग्रामविकास विभागाच्या सचिवानी शबरी घरकूल योजनेच्या तुलनेत रमाई घरकूल आवास योजनेकरिता जवळपास दुप्पट निधी वाढवून दिला आहे. रमाई घरकूल आवास योजनेसाठी एसईसीची कोणतीही अट नाही. त्यात ग्रामसभेने निर्णय घ्यावयाचा असतो. तसेच ग्रामसभेकडून निर्णय घेत असताना ज्यांच्याकडे मोठी घरे आहेत त्यांना घरकुले मिळत नाहीत. या संदर्भात अधिकारी प्रत्यक्षात पाहणी करून संबंधित लाभार्थ्याला घरकुलाची खरोखर गरज आहे किंवा नाही याची शहानिशा करीत असतात. परंतु याकरिता विरोध केला जातो की, मला खरोखर घरकुलाची गरज असताना देखील दुसऱ्या लाभार्थ्यानंतर

मला घरकूल मिळण्याची शक्यता आहे. परंतु एखाद्या व्यक्तीला घरकुलाची गरज नसल्यास त्यांना घरकूल मिळत नाही. या संदर्भात त्यांचा फोटो घेतला जातो, त्यांना त्यांच्या बँकेच्या अकांऊटमध्ये डायरेक्ट पेमेंट केले जाते. अशा परिस्थितीत चुकीच्या व्यक्तींना घरकुलाचा लाभ मिळण्याची शक्यता कमी असते. गरजू लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ मिळाला पाहिजे. परंतु त्यांच्या अगोदर किंवा नंतर लाभ देण्यासंबंधी ग्रामसभेत थोडे मागेपुढे होऊ शकते, असे विदित केले.

समितीने ग्रामपंचायत ही कोणत्याही गावाची नसते. तेथे अनेक विरोधक असतात, यामुळे तेथे राजकारण होत असते. परंतु जे लोक गावांमध्ये राहतात, त्यांना घरकूल योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे ते घरकुलांपासून वंचित राहतात. अशा लोकांना तातडीने घरे मिळणे ही काळाची गरज आहे, असे नमूद केले असता, ग्रामविकास सचिवांनी अशी परिस्थिती असल्यामुळे ग्रामपंचायतीऐवजी ग्रामसभेला अधिकार दिलेले आहेत. ग्रामसभेमध्ये प्रत्येक मतदार हा सदस्य असतो. ग्रामसभेकडून लाभार्थ्यांची यादी मंजूर केली जाते. परंतु त्यात चुकीच्या लोकांचा समावेश झाल्यास त्याची तपासणी करण्याची जबाबदारी तालुक्यात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची असते. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांच्या अधिपत्याखाली असलेली समिती सदर लाभार्थ्यांना घरकुलांचे वाटप करायचे किंवा नाही यासंबंधी निर्णय घेत असते. गरजू लाभार्थ्यांच्या ज्येष्ठता यादीमध्ये ज्येष्ठता कमी जास्त झाल्याची शक्यता आहे. त्यासंबंधी तक्रारी येत असतात. आपल्याला ग्रामसभेव्यतिरिक्त दुसरा कोणताही पर्याय नाही. ग्रामसभा ज्याप्रमाणे व्हावयास पाहिजे तशा होत नाहीत ही वस्तुस्थिती आहे, असे सांगितले.

समितीने ग्रामसभेच्या माध्यमातून काही लाभार्थ्यांना घरकुले मिळाली असतील, त्यात एकतर्फी (वन साईड) काही झाले असेल. परंतु गरजू लाभार्थी घरकूल योजनेपासून वंचित राहिले असल्यास त्यांचे प्रबोधन करणे व तेथे त्यांना माहिती देण्यासाठी अधिकारी पाठविल्यास त्यांना पंतप्रधान घरकूल आवास योजना तसेच इतर विविध घरकूल योजनेमधून घरकुले मिळू शकतील. सदर योजनेतून गरजू लाभार्थी वंचित राहू नयेत यासाठी आपण सर्व्हे केल्यास सर्व गरजू लाभार्थ्यांना घरकुले मिळू शकतील, असे नमूद केले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शाहूवाडी तालुक्यासंबंधी सांगायचे झाल्यास ग्रामसभेने ज्या लाभार्थ्यांना घरकुलासाठी अपात्र केले होते. त्या लाभार्थ्यांना गट विकास अधिकाऱ्यांमार्फत नोटीसेस पाठविण्यात आल्या. तसेच काही ठिकाणी लाभार्थी उपस्थित न राहिल्यामुळे गटविकास अधिकारी स्वतः त्यांच्या घरी गेले होते. तसेच ग्रामसभेने अपात्र केलेल्या लाभार्थ्यांना जिल्हा परिषदेने पात्र लाभार्थी जाहीर केले. ग्रामसभेकडे लाभार्थी पात्र किंवा अपात्र करण्याचे अधिकार असल्यामुळे एखाद्या वेळी पात्र लाभार्थी अपात्र किंवा अपात्र लाभार्थी पात्र होऊ शकतो. ग्रामसभेने घेतलेला निर्णय हा अंतिम नाही. यामुळे सदर दोन्ही गोष्टींमध्ये तालुकास्तरीय समितीने दिलेल्या अहवालाच्या आधारे गरजू लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेत आहोत. तसेच तालुकास्तरीय अधिकाऱ्यांकडून काही त्रुटी राहिल्यास त्यासंबंधी जिल्हास्तरीय तपासणी करून अपात्र लाभार्थ्यांना पात्र किंवा पात्र लाभार्थ्यांना अपात्र केले आहे, अशी माहिती दिली.

समितीने सन २०१४-२०१५ या वर्षी अखर्चित राहिलेली मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम अनुसूचित जातीच्या कल्याणासाठीच्या योजनांसाठी वापरण्याकरिताचा प्रस्ताव राज्याच्या वित्त विभागाकडे पाठविण्यात आला आहे काय, असल्यास कधी व नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत? अशी विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१४-२०१५ या वर्षात ४ कोटी ३३ लाख रुपये रक्कम प्राप्त झाली होती. याकरिता १२७७ विद्यार्थ्यांचे याकरिता अर्ज प्राप्त झालेले आहेत, त्यांना आम्ही शिष्यवृत्ती मंजूर केलेली आहे. उर्वरित रक्कम आम्ही शासनाकडे समर्पित केलेली आहे. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मिळावा याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रे वितरीत करण्याकरिता तालुक्यांमध्ये कँप घेण्यात आलेले आहेत. समितीच्या दौऱ्यानंतरदेखील याबाबत अधिक नियोजन केलेले आहे. त्याचा परिणाम होऊन सन २०१५-१६ मधील १२७७ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांवरून ही संख्या ३१०६ पर्यंत गेलेली आहे. सन २०१६-२०१७ मध्ये ३९९२ पर्यंत ही संख्या वाढली आहे. मागील वर्षी ७५ लाख, सन २०१६-२०१७ मध्ये ८९ लाख रुपये या योजनेवर खर्च केलेले आहेत. या पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याकरिता आम्ही सतत नियोजन करीत आहोत. तसेच पात्र लाभार्थी विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याची काळजी घेतली आहे, असे सांगीतले.

समितीने शाळा प्रशासनाने शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया पूर्ण केली पाहिजे. कारण काही मुलांची अशी तक्रार असते की, आम्ही अर्ज देऊनही शाळेने पाठविलेले नाही, असे विचारले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबतच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत काही अडचण आल्यास संबंधित मुख्याध्यापकांना जबाबदार धरण्यात येईल असेही कळविले आहे. जातीचे दाखले मिळण्याबाबत अडचण असते परंतु सर्व प्रांत अधिकाऱ्यांनी व्यवस्थित नियोजन केलेले आहे त्यामुळे शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झालेली आहे, असे सांगितले.

समितीने सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात २० टक्के सेस फंडातून समितीने सूचविलेले समाज मंदिर बांधकाम प्रस्ताव मंजूर न करण्याची कारणे काय आहेत? हातकणंगले तालुक्यातील ४ समाजमंदिराचे बांधकाम करण्याबाबतचे प्रस्ताव सादर केलेले आहेत. परंतु यामधील एकही प्रस्ताव मान्य करण्यात आलेला नाही. मागासवर्गीयांची सर्वात जास्त लोकसंख्या हातकणंगले तालुक्यामध्ये आहे. त्या मतदारसंघाचा प्रतिनिधी म्हणून समिती सदस्यांनी महत्वाचे प्रस्ताव दिलेले होते. ते डावलले गेले. इतर ठिकाणी त्यांची गरज आहे की नाही हे समिती सदस्यांना माहिती नाही. हे प्रस्ताव नेमके कोणी डावलले आहेत, असे एका समिती सदस्यांनी विचारले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेने मागासवर्गीयांसाठी राखीव २० टक्के सेस फंडांतर्गत सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात १०.०५ कोटी रुपये इतकी तरतूद केली होती. त्यातून समाजमंदिर दुरुस्ती करणे या योजनेसाठी ५० लाख रुपये इतकी तरतूद करण्यात

आली होती. त्यातून ५० समाजमंदिर दुरुस्तीची कामे मंजूर केली असून ५० लाख रुपये इतका खर्च झालेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.सुजित मिणचेकर यांच्या हातकणंगले मतदारसंघातील ४ प्रस्ताव दिल्याचे त्यांनी बैठकीत सांगितले आहे. अशा प्रस्तावांना मंजुरी देण्याचे अधिकार समाजकल्याण समितीस आहेत. या समितीने सदर प्रस्ताव नामंजूर केल्याने ते पुढील वर्षी म्हणजे २०१६-२०१७ मध्ये मंजूर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यवाही करावी असे निर्देश माननीय समिती प्रमुखांनी दिले होते. परंतु २० टक्के सेस फंडातून समाजमंदिरांची दुरुस्ती करणे ही योजना सन २०१५-२०१६ या वर्षापर्यंतच राबविण्यात आली आहे. सन २०१६-२०१७ मध्ये सदर योजना घेतली नसल्याने सन्माननीय सदस्य डॉ.सुजित मिणचेकर यांनी दिलेले प्रस्ताव मंजूर करता आले नाहीत. समाजकल्याण अधिकारी हे या समितीचे सचिव म्हणून कार्यरत असतात. याबाबतची समिती व त्यातील सदस्यांना याबाबतचे अधिकार आहेत. तेथील सचिवांनी गुणवत्तेनुसार प्रस्ताव समितीसमोर मांडलेले आहेत. हे प्रस्ताव मान्य करण्याचे अधिकार त्या समितीला आहेत, असे सांगितले.

समितीने सामान्य प्रशासन विभागातील मंजूर पदांचे शासन निर्णय व आकृतीबंध तपासणी करण्याचे काम केव्हापर्यंत पूर्ण होईल? असे विचारले असता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जुलै, २०१६ च्या रोष्टर तपासणीच्या अहवालात सरळसेवेचे ३९ व पदोन्नतीचे ३३ असे एकूण ७२ संवर्ग आहेत. सर्व रोष्टर आम्ही तपासणीकरिता मागासवर्गीय कक्ष, पुणे यांच्याकडे सादर केलेले आहेत. पाठपुरावा करून पडताळणी पूर्ण झालेल्या रोष्टरची संख्या २७ आहे. ४५ रोष्टर कागदपत्रे, नियुक्ती आदेश अशा अंतिम तपासणीमध्ये आहेत. दरमहा आम्ही मागासवर्गीय कक्षाच्या संपर्कामध्ये असतो. हे काम वेगाने केले जात आहे. निम्म्यापेक्षा अधिक रोष्टर हे तपासून परिपूर्ण झालेले आहेत, असे सांगितले.

समितीने मागासवर्गीय कक्षाच्या संबंधित उपस्थित अधिकाऱ्यांनी याबाबत माहिती द्यावी व आता बॅकलॉगची पदे भरण्यास काही अडचण आहे का? अशी विचारणा केली असता, सहायक आयुक्त (मावक) यांनी कोल्हापूर जिल्हा परिषदेचे रोष्टर सतत तपासणीकरिता येत आहेत. सामान्य प्रशासन विभागाचे रोष्टर तपासून दिलेले आहेत. तेथील बऱ्याच विभागाच्या अधिकाऱ्यांनी भेटून आमचे मार्गदर्शन घेतलेले आहे. आकृतीबंधाचे जी.आर., नियुक्तीचे आदेश, नियुक्तीचा प्रवर्ग, असलेला बॅकलॉग याबाबतची माहिती आम्ही मागितलेली आहे. परंतु आता बॅकलॉगची पदे भरण्यास अडचण नाही, असे सांगितले त्यावर समितीने अनुसूचित जातीच्या १३ टक्के आरक्षणामध्ये खुल्या संवर्गातील पद भरती झाल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे, त्यामुळे दौऱ्याच्या वेळी समितीने याबाबत आदेश दिलेले होते. अनुसूचित जातीचा बॅकलॉग १३ टक्केप्रमाणे भरला गेला आहे का हा महत्वाचा मुद्दा आहे, असे नमूद केले असता, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मंजूर रोष्टरप्रमाणे आम्ही भरती करीत असतो. शिक्षक संवर्गात ८००० पेक्षा अधिक शिक्षक आहेत. त्यापैकी ३००-४०० शिक्षकांची पडताळणी बाकी आहे. कारण प्रत्येक

शिक्षकाचा मूळ नियुक्तीचा आदेश, जातीचे प्रमाणपत्र व पुरावे तपासले जातात. हा महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील महत्वाचा प्रश्न आहे. १९८०-१९९० दशकातील मागासवर्गीय उमेदवाराची प्रथम नेमणूक करताना तो त्याची कोणत्या बिंदूवर नियुक्ती झाली आहे हे पहावे लागते. मेरीटमध्ये असेल तर खुल्या संवर्गात त्याची नियुक्ती झाली असेल. आता रोष्टर मंजूर करताना खुल्या संवर्गाच्या अगेंस्ट त्यास दाखवावे लागेल. त्यामुळे महाराष्ट्रातील फक्त १३-१४ जिल्ह्यांमध्ये नियमाप्रमाणे रोष्टर पूर्ण करु शकलो आहेत. ज्या उमेदवारांची नियुक्ती २०-२५ वर्षांपूर्वी झाली असेल त्यांच्या बिंदू नामावलीचा बिंदू कळत नाही. पुणे, सोलापूर व कोल्हापूर येथेही हा प्रश्न आहे, अशी माहिती दिली.

समितीने ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती खुल्या प्रवर्गात झाली आहे त्या कर्मचाऱ्यांचे रेकॉर्ड मिळत नसतील तर त्यासाठी काही तरी बेस धरुन त्यांना अनुसूचित जाती मध्ये दर्शविणे आवश्यक आहे. रोष्टरची तपासणी पूर्ण झाल्यावर व रेकॉर्ड मिळाल्यानंतर यासंदर्भातील पुढील कार्यवाही करण्यात यावी व त्यांना खुल्या प्रवर्गात दर्शविण्यात यावे, असे निदेश दिले असता ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी विभागीय आयुक्त, पुणे यांना यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे, त्यांची मान्यता मिळाल्यानंतर त्या अनुषंगाने दुरुस्ती करण्यात येईल. जे कर्मचारी खुल्या प्रवर्गातून जॉईन झाले आहेत त्यांचेकडील व्हॅलिडीटी प्रमाणपत्र पाहून त्यांना त्या प्रवर्गात पदोन्नती देता येईल. अशा प्रकारे कार्यवाही केली तर यातून मार्ग निघू शकतो, असे सांगीतले.

समितीने याबाबत असे निदेश दिले की, त्या कर्मचाऱ्यांना अनुसूचित जाती प्रवर्गात दर्शवून पदोन्नती देता येईल. आता पदोन्नती देताना व्हॅलिडिटी प्रमाणपत्र देणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबत कोणाचेही दुमत नाही. कर्मचाऱ्यांना पदोन्नती देताना अडचण नाही. जात वैधता प्रमाणपत्र आहे किंवा नाही ते पाहून पदोन्नती देण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीने तपासणी केली तेव्हा सरळसेवेची ११६ पदे व पदोन्नतीची १६९ पदे होती. १ एप्रिल २०१६ ते मार्च, २०१७ अखेरपर्यंत १५ पदे सरळसेवेची भरण्यात आली असून ६ पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत. अशा प्रकारे २१ पदे भरण्यात आली आहेत. दरम्यानच्या कालावधीत सेवानिवृत्ती, पदोन्नती व अन्य कारणामुळे काही पदे रिक्त झाली आहेत. त्यामुळे आता ३० एप्रिल २०१७ अखेर सरळसेवेची १३२ पदे व पदोन्नतीची १७४ पदे रिक्त आहेत. शासकीयस्तरावर भरतीची प्रक्रिया सुरू आहे. आता ऑनलाईन भरती प्रक्रिया करण्यात येत आहे, यासंदर्भातील शासन निर्णय काही दिवसात काढण्यात येणार आहे. ऑनलाईन भरती प्रक्रियेला मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे. काही दिवसात शासन निर्णय काढण्यात येईल. त्यानंतर एचपीसीची मान्यता एक महिन्यात घेण्यात येईल. त्यानंतर जिल्हास्तरावरुन भरती प्रक्रिया सुरू करण्यात येईल, असे सांगितले.

समितीने रिक्त पदांचा अनुशेष भरण्यासाठी आणखी किती कालावधी लागणार आहे, अशी विचारणा केली असता,ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी खुल्या प्रवर्गात ज्यांची नियुक्ती झाली आहे त्यांची कागदपत्रे मिळणे आवश्यक आहेत. कागदपत्रे मिळत नाही तोपर्यंत त्यांना अनुसूचित जातीमध्ये दर्शविण्यात येईल. असे केल्यामुळे अनुसूचित जातीच्या एका पदाचे नुकसान होणार आहे, असे सांगीतले.

समितीने शासनाकडील ग्रामपंचायत विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक, इ.मंजूर आकृतीबंधाबाबत मावक कक्षाकडून सन २०११ मध्ये झालेल्या रोष्टर तपासणीसाठी आणखी किती कालावधी लागणार आहे. तसेच शिक्षण विभागाची बिंदू नामावली नोंदवही पडताळणी पूर्ण झाली असून मंजूर पदांचे शासन निर्णय व आकृतीबंध तपासणी करण्याचे काम केव्हा पूर्ण होईल. अशी विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिक्षण विभागाची बिंदू नामावली तपासण्यात येत आहे, खाजगी संस्थांची बिंदू नामावली तपासणी करण्यास विलंब होत आहे, असा मुद्दा उपस्थित केला असता सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (मावक) यांनी असे नमूद केले की, आमच्याकडे जिल्हा परिषदेकडून प्रस्ताव सादर केल्यानंतर ८ ते १० दिवसांत तारीख देऊन पुढील कार्यवाही करण्यात येते.

समितीने माजी सैनिक प्रवर्गातील २ उमेदवार उपलब्ध न झाल्याने सरळसेवेने रिक्त असलेल्या अनुसूचित जातीची माजी सैनिक प्रवर्गातून दोन पदे भरण्यात आली आहेत काय? व्हीजेएनटी संवर्गातील काही पदे मिळत नाहीत, ती पदे रिक्त राहिली तर कालबद्ध कार्यक्रम तयार करून ती पदे इतर प्रवर्गातून भरता येतात काय? अशी विचारणा केली असता, मुख्य कार्य अधिकारी यांनी आरोग्य सेवक महिलांची १० पदे रिक्त आहेत. सात पदे सरळसेवेने भरल्यानंतर एक पद आंतरजिल्हा बदलीने मिळेल. माजी सैनिकामधून दोन उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे दोन पदे रिक्त होती, जाहिरात दिल्यानंतर ती पदे पुन्हा रिक्त राहिली तर पुढील सरळसेवा भरतीच्या वेळी ती पदे इतर संवर्गातून भरण्यात येतील. व्हीजेएनटी मध्ये अ,ब,क व ड असे प्रवर्ग आहेत, अ प्रवर्ग मिळाला नाही तर ब प्रवर्गाचा उमेदवार घेण्यात येतो. त्यानंतर क व ड प्रवर्गाचा उमेदवार घेण्यात येतो. अ,ब,क,ड मध्ये वेगवेगळ्या जाती आहेत. व्हीजेएनटीचे उमेदवार त्याच प्रवर्गातून भरणे आवश्यक आहे. आता पुढील भरती ऑनलाईनद्वारे होणार असल्यामुळे जिल्ह्यापुरती मर्यादित न राहता ती संपूर्ण राज्यभर असल्यामुळे व्हीजेएनटीचे उमेदवार मिळतील, असे सांगितले.

समितीने स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गातील सर्व पदे सरळसेवेने भरण्याचे शासन आदेश आहेत, सदरची रिक्त पदे ही पदोन्नतीची नसून सरळसेवेची आहे. पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे? अशी विचारणा केली असता, मुख्य कार्य अधिकारी यांनी या पदांची भरती प्रक्रिया सुरू आहे. माननीय मुख्यमंत्री यांनी मान्यता दिल्यानंतर जुलै ते ऑगस्ट महिन्यात भरती प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती दिली. त्याबाबत समितीने जुलै-ऑगस्ट महिन्यात १०० टक्के भरती प्रक्रिया करण्यात येईल काय, यासंदर्भातील शासन निर्णय काढल्यावर तातडीने कार्यवाही करण्यात यावी व भरती प्रक्रिया तातडीने करण्यात यावी असे निदेश दिले.

समितीने अनुसूचित जातीची सरळसेवेची सामान्य प्रशासन विभागातील सन २०१६-१७ या कालावधीत सरळसेवेची १५, पदोन्नतीची ६ अशी एकूण २१ पदे भरण्यात आली, तथापि, याच कालावधीत सरळसेवेची ३१ व पदोन्नतीची ०५ अशी एकूण ३६ पदे सेवानिवृत्ती, पदोन्नती आंतरजिल्हा बदली इ. कारणांनी पुन्हा रिक्त झाली आहेत. सदर पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे? तसेच जिल्हा परिषदा व नगरपालिकांच्या शाळा त्याचप्रमाणे खाजगी शाळांच्या रोष्टरची तपासणी करून घेत नाही. ते कोणालाही जुमानत नाही. यासाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व आयुक्त यांनी यासंदर्भात एकत्रित कार्यवाही करणे अपेक्षित आहे. रोष्टरची तपासणी करण्यात येत नाही त्यामुळे अडचणी वाढत आहेत. ज्या खाजगी शाळा रोष्टरची तपासणी करणार नाहीत त्यांचे अनुदान थांबविण्याची कारवाई शासनाने केली पाहिजे, असे सूचविले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २ मे २०१२ च्या शासन निर्णयानुसार पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासित केले.

समितीने यापूर्वी जी भरती करण्यात आली त्याबाबत काय निर्णय घेण्यात येणार आहे. खाजगी शिक्षण संस्था रोष्टर तपासणी करीत नाही त्यामुळे त्यांच्याकडे १० वर्षे नोकरी केलेले लोक तक्रारी करतात. कालबद्ध कार्यक्रम तयार करून रोष्टर तपासणी करून संस्थेतील शिक्षकांना न्याय दिला पाहिजे. अनेक खाजगी शिक्षण संस्थांमध्ये १० वर्षे नोकरी करून रोष्टरची तपासणी न केल्यामुळे त्या कर्मचाऱ्यांना स्थायी (परमनंट) करण्यात येत नाही. त्याऐवजी दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवाराला नियमित केले जाते, ज्या उमेदवाराने १० वर्षे नोकरी केली त्याच्यावर अन्याय केला जातो. त्यामुळे खाजगी शिक्षण संस्थांच्या संदर्भात आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष घालून खाजगी शिक्षण संस्थांच्या संदर्भात कडक कारवाई केली पाहिजे. नियमानुसार रोष्टर तपासणी करून कार्यवाही करणे अपेक्षित आहे, असे नमूद केले असता, समितीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची सद्य:स्थिती काय आहे? स्मारकाच्या कामाची सुरुवात करण्यात आली आहे काय? नसल्यास त्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधीकारी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी २ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. आयुक्त व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती दिली.

समितीने श्रीमती शिंदे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या संदर्भातील विषय काय होता ते पाहणे आवश्यक आहे. शिक्षणाधिकारी व पदाधिकारी एकत्र येतात व त्या अधिकाऱ्याविरोधात अभिप्राय देतात त्यानंतर त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येते. याबाबत काय करण्यात येणार आहे तसेच या प्रकरणी चौकशीची सद्य:स्थिती काय आहे? अशी विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या विषयाच्या संदर्भामध्ये आम्ही जीडीच्या टीमची नियुक्ती केली. या टीमच्या कामाची दप्तर तपासणी केली असून या कामामध्ये ज्या काही त्रुटी आढळल्या आहेत त्या त्रुटीवर माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचा

अभिप्राय मागवण्यात आलेला आहे. या अभिप्रायावर अभ्यास केला हा अभिप्राय समाधानकारक वाटत नसल्यामुळे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर एका कमिटीची नेमणूक करण्यात आली आहे. कमिटीने या सर्व विषयामध्ये पुन्हा सखोल अभ्यास केला व पुन्हा या विषयी माहिती मागविली आणि त्यांचा अंतिम खुलासा व आमच्या कमिटीचा अभिप्राय यावर आम्ही अभ्यास करून एक अहवाल तयार केला व तो अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे. यावर सचिवांनी शिक्षण संचालक यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी स्थापन केली असून ही कमिटी पुढील चौकशी करीत आहे. या विषयाच्या संदर्भामध्ये रिपोर्टर किंवा कोणत्या संस्थेने जरी या विषयी तक्रार केली तरी या विषयी सत्य परिस्थितीवर, त्यांच्या खुलाशावर व आमच्या कमिटीच्या अभिप्रायावर योग्य ती चौकशी केली जाईल. या प्रकरणामध्ये संचालकांची चौकशी सुरू आहे. मॅडम रजेवर गेलेल्या आहेत. या प्रकरणी माननीय आयुक्तानी ३१ मार्च रोजी आदेश काढलेला आहे. या आदेशामध्ये असे नमूद केलेले आहे की, सदर तपासणी सुरू आहे. ही तपासणी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना कामावर रुजू करून घेऊ नये, अशी माहिती दिली असता समितीने या प्रकरणामध्ये मॅडम रजेवर गेलेल्या आहेत की, त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आलेले आहे. या चौकशीचा कालावधी काय आहे? कालावधी निश्चित नसेल तर तो ठरवून घ्या. ही पदे तुम्हाला भरता येणार नाहीत काय? नाहीतर संबंधित अधिकाऱ्यांची बदली केल्यानंतर तुम्हाला हा निर्णय घेता येईल, असे सांगीतले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या चौकशीचा कालावधी ठरवून घेऊ. जिल्हा परिषदमध्ये रिक्त पदामुळे या कामी वेळ लागत आहे. या संदर्भामध्ये शिक्षण विभागाला आम्ही इंटिमेट करु. त्यानुसार शिक्षण विभाग पुढील निर्णय घेईल, असे आश्वासित केले.

समितीने समाज कल्याण विभागास निधी उपलब्ध झालेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची मदत घेऊन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त आपण सर्व नियोजन केलेले आहे त्याचा आराखडा तयार करून लवकर अंमलबजावणी करावी. कारण या संदर्भामध्ये जिल्हा परिषद व बीडीओ यांचे काम संथ गतीने सुरू आहे. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी व माननीय मुख्यमंत्री यांचे स्वप्न आहे की, प्रत्येक खासदार व आमदार यांनी जे गाव दत्तक घेतलेले आहे किंवा त्यांच्या आमदार खासदार निधीतून त्यांनी तेथील कामे लवकरात लवकर करावी. सार्वजनिक बांधकाम विभागाची जी कोणती यंत्रणा असेल तिचा कालावधी ठरवून हे काम केले तर चांगले होईल.ल शासनाने याकामी भरपूर निधी उपलब्ध करून दिलेला आहे. अनुसूचित जाती व जमाती या समाजाची कामे करण्यासाठी समाज कल्याण विभागास विशेष पुढाकार घेऊन काम करावे लागेल. सन्माननीय सदस्यांनी जे गाव दत्तक घेतलेले आहे त्या गावाचा विकास करण्यासाठी त्यांना विशेष निधी मिळत नाही. आमदार निधीतून ज्या गावांचा विकास केला जातो त्यात प्रथम प्राधान्य हे दत्तक घेतलेल्या गावांना दिले जाते. पहिले काम करीत करीत हे काम केले जाते तशाच प्रकारे कमिटी ज्याप्रमाणे काम सांगेल त्या प्रमाणे कामे पूर्ण करून घेतली पाहिजे. रत्नागिरी जिल्ह्यातील दोन गावे माननीय खासदारांनी दत्तक घेतलेली आहेत व तीन गावे ही आमदारांनी

घेतलेली आहेत.त या पाचही गावामध्ये विकासाची कोणतीच कामे सुरू केलेली नाहीत. असे नमूद केले. यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी माननीय आमदार व खासदार यांनी जी गावे निवड केलेली आहे, त्या गावातील जवळ जवळ ४,५०० कामे सुरू केलेली आहेत त्यातील जवळ जवळ ३,४०० कामे पूर्ण झालेली आहेत. यातील शिल्लक ११०० कामे झालेली नाहीत. ही कामे करण्यासाठी अडथळा येत आहे, असे सांगीतले.

समितीने सहायक आयुक्त यांनी बिंदू नामावली दोन वेळा तपासणीसाठी वेगवेगळी तारीख देण्याची कारणे काय आहेत? असे विचारले असता सहायक आयुक्तांनी बिंदू नामावलीतील आकृत्तीबंध जुळत नव्हता. आदेश व त्यांच्या मूळ प्रती त्यांच्याकडे नव्हत्या. यामूळ प्रती शोधण्याचे काम सुरू होते. दोन दिवसापूर्वी त्यांना संपर्क केले होते. तुमच्या मूळ प्रती सापडल्या असतील तर तपासणीसाठी माझ्याकडे आणून द्या असे सांगण्यात आले होते. नोव्हेंबरच्या शेवटी सर्व बिंदू नामावल्या तपासून घेतलेल्या आहेत. ज्या प्रमाणे सहायक आयुक्त यांच्या सूचना होत्या त्या प्रमाणामध्ये बिंदू नामावल्या तपासण्याचे काम पूर्ण केलेले आहे. या विषयाच्या संदर्भामध्ये सर्व कागदपत्रे तयार आहेत.

**अभिप्राय व शिफारशी :**

(१) समितीने जिल्हापरिषदेमधील सन २०११ नंतरच्या वर्ग-३ च्या भरती प्रक्रिये संबंधात विचारणा केली असता संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समितीस अशी माहिती दिली की, जिल्हापरिषदेतील काही विभागांमधील वर्ग-३ च्या बाबतचे रोष्टर सन २०११ पर्यंत तपासले आहे. मात्र सन २०११ मध्ये तपासलेले रोष्टर पुन्हा तीन वर्षांनी म्हणजेच सन २०१४ मध्ये तपासणे आवश्यक होते. ते अजून तपासून घेण्यात आलेले नाही त्याबाबतची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. यावर समितीने असा अभिप्राय व्यक्त केला की, सन २०११ नंतर २०१४ मध्ये रोष्टर तपासणे आवश्यक होते. आता सन २०१७ हे वर्ष सुरू होईल. म्हणजेच रोष्टर न तपासण्याच्या प्रक्रियेला आता जवळपास ५ वर्षांचा कालावधी होत आहे. त्यामुळे अनुसूचित जातीच्या उमेदवारांची सरळसेवेने भरती होण्यास सुमारे पाच वर्षांचा विलंब झाल्याने त्यांचे वयाधिक होऊन त्यांच्यावर मोठा अन्याय झालेला आहे असा अभिप्राय व्यक्त करून अशी शिफारस केली की, **जिल्हापरिषदेच्या काही विभागांनी सन २०११ नंतरही बिंदुनामावलीचे रजिष्टर (रोष्टर) तपासून घेतलेले नाही ही बाब अत्यंत गंभीर असून यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत चौकशी करून दोषी आढळून आलेल्या सर्व संबधितावर उचित कारवाई करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) राज्यातील विभागीय स्तरावरील सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीतील मागासवर्ग कक्षाकडे संबंधित जिल्ह्यातील अनेक शासकीय, निमशासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित खाजगी संस्था ही कार्यालये त्यांच्या कार्यालयांशी वा संस्थांशी संबंधित बिंदू नामावलीची (रोष्टर) तपासणी करण्यासाठी प्रस्ताव पाठवित असतात मात्र सदर मागासवर्ग कक्षातील अपुरे मनुष्यबळ तसेच कार्यक्षेत्र व संवर्गाची मोठी व्याप्ती/संख्या असल्याने रोष्टर तपासण्यास विलंब लागत असल्याचे समितीस आढळून आले. परिणामी रोष्टर तपासणीसाठी आलेल्या कार्यालयांना किंवा संस्थांना पुढील काही महिन्यातील तारीख दिली जाते. त्यामुळे अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेस विलंब होतो. याबाबत समिती शासनास अशी शिफारस करीत आहे की, **विभागीय आयुक्त स्तरावरील सहाय आयुक्त (मागासवर्ग कक्ष) या कक्षातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने प्राथम्यक्रमाने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(३) शासन निर्णयाप्रमाणे सर्व शासकीय, निमशासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित खाजगी संस्थानी सरळसेवेने अधिकारी व कर्मचारी यांची भरती करण्यासाठी प्रथम बिंदूनामावलीची (रोष्टर) विभागीय स्तरावरील सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांचेकडून तपासणी करून घेणे व त्यानंतर दर तीन वर्षांनी बिंदू नामावली अद्यावत करून त्याची उक्त कक्षाकडून तपासणी करून घेणे बंधनकारक असते. तथापि, समितीच्या असे निदर्शनास आले की, **बऱ्याच शासकीय, निमशासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित खाजगी संस्था यांच्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची भरती, बढती, अनुशेष व आरक्षणासंदर्भात कार्यवाही विहित कालावधीत करणे अपेक्षित असतानाही उक्त नमूद कार्यालयांकडून याचे तंतोतंत पालन होत असल्याचे दिसून येत नाही. परिणामी संबंधित संवर्गाची अद्यावत बिंदुनामावली तयार नसल्याने भरती प्रक्रियेस विलंब होऊन संबंधित संवर्गातील उमेदवारांवर अन्याय होतो. त्यामुळे बिंदूनामावलीची तपासणी विहित कालावधीत होण्यासाठी शासनाने सर्व संबंधित कार्यालयांना तातडीने आदेश द्यावेत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध पदांवर उमेदवारांच्या नियुक्ती करण्यासाठी सेवा प्रवेश नियम तयार केले आहेत काय, असल्यास त्यांचे स्वरुप काय आहे, तसेच पदे भरण्याबाबत अवलंबविण्यात येणाऱ्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती देण्यात यावी असे सूचित केले असता जिल्हाधिकारी यांनी वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे शासन स्तरावर भरली जात असल्यामुळे त्या पदांचा अनुशेष येथे निघणार नाही. त्याबाबत शासन स्तरावर अनुशेष निघतो अशी माहिती दिली. यावर आपल्याकडे प्रांताधिकारी हे पद

भरलेले आहे काय? तसेच, उप जिल्हाधिकारी, महसूल हे पद रिक्त आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हाधिकाऱ्यांनी उप जिल्हाधिकारी महसूल हे पद रिक्त आहे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हाधिकारी १, अपर जिल्हाधिकारी १, उप जिल्हाधिकारी १४, तहसीलदार २१, नायब तहसीलदार ५९, लेखाधिकारी २, सहायक लेखाधिकारी ३ उप लेखापाल ४, उघुलेखक (उ.श्रे.) १ ही पदे मंजूर आहेत. प्रांताधिकारी आहेत. परंतु उप जिल्हाधिकारी हे पद रिक्त आहे. डेप्युटी चिटणीस हे पद रिक्त आहे. हातकणंगले येथील तहसीलदार यांची नियुक्ती गगनबावडा येथे झाली होती. परंतु मॅटने त्यास स्थगिती दिलेली आहे. एकूण ३ पदे रिक्त आहेत, अशी माहिती दिली.

समितीने वर्ग-३ व वर्ग-४ या संवर्गातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांची संवर्गनिहाय माहिती तसेच राखीव ठेवण्यात आलेल्या पदांपैकी माहे मार्च २०१६ अखेर एकूण किती पदे भरण्यात आली आहेत व किती पदे रिक्त आहेत, पदे रिक्त रहाण्याची कारणे काय आहेत, यासंदर्भात माहिती देण्यात यावी असे सूचित केले असता जिल्हाधिकारी यांनी समितीस सादर केलेल्या माहितीत कॅटेगिरी वाईज माहिती दिलेली आहे त्यात वर्ग-३ मध्ये ५ कॅटेगिरी येत असून त्यात लिपिक, अवर कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी व वाहन चालक ही पदे येतात, अशी माहिती दिली. यावर समितीने अनुसूचित जातीची १३ टक्के पदे भरलेली आहेत काय व किती पदे रिक्त आहेत याबाबत माहिती देण्यात यावी, असे सूचित केले असता जिल्हाधिकारी यांनी यामध्ये दोन बाबी आहेत. पदोन्नती आणि सरळसेवेने पद भरती केली जाते. त्यामध्ये दिलेली माहिती ७५ आणि २५ च्या रेश्यो प्रमाणे दिलेली आहे. परंतु आता ५०-५० याप्रमाणे शासन निर्णय आलेला आहे. अवर कारकून पदाची एकूण १८२ पदे मंजूर आहेत, त्यापैकी १३ टक्के प्रमाणे अनुसूचित जातीची २४ पदे भरणे आवश्यक असून सदरहू पदे भरलेली आहेत. मंडळ अधिकाऱ्याची एकूण मंजूर ७६ पदे असून १३ टक्के प्रमाणे अनुसूचित जातीची १० पदे भरणे आवश्यक आहे. सदरहू १० पदे भरण्यात आलेली आहेत. लिपिक-टंकलेखकांची ७५ टक्के प्रमाणे २१५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १३ टक्के प्रमाणे २८ पदे होतात. परंतु आम्ही ३४ पदे भरलेली आहेत. पदोन्नतीने लिपिक-टंकलेखकाची एकूण ७१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १३ टक्के प्रमाणे ९ पदे होत असून आम्ही ६ पदे भरलेली आहेत. पदोन्नती करीत असताना प्रमोशनसाठी मनुष्यबळ नव्हते. पदोन्नती न मिळाल्यास शासन निर्णयानुसार ते पद सरळ सेवेने देखील भरता येते, अशी माहिती दिली.

समितीने त्या कालावधीमध्ये पात्र उमेदवार न मिळाल्यास ती पदे सरळसेवेने भरावी लागतात. पदोन्नतीमध्ये मायनस ३ व सरळसेवेमध्ये प्लस ६ असे आहे काय? कोतवालाचे पद केव्हापासून रिक्त आहे? पोलीस पाटील हे पद थेट परिक्षेतून भरण्यात येते काय? असे विचारले असता जिल्हाधिकारी यांनी असे सांगितले की, त्या कालावधीमध्ये उमेदवार न मिळाल्यास त्यांना सरळसेवेमध्ये आणले जाते. त्यामुळे सरळ सेवेमध्ये ६ पदे जास्त भरलेली असून पदोन्नतीमध्ये ३ पदे कमी आहेत. परंतु एकूण विचार केला तर

३ पदे जास्तच आहेत. तसेच वाहन चालक संवर्गात एकूण मंजूर पदे २५ असून १३ टक्के प्रमाणे ३ पदे भरणे आवश्यक आहे. सदरहू ३ पदे भरलेली आहेत. शिपाई संवर्गातील ६२ पदे मंजूर असून १३ टक्के प्रमाणे ८ पदे भरणे आवश्यक आहे. त्यापैकी ६ पदे भरण्यात आलेली आहे. उर्वरित २ पदे या वर्षी भरणार आहोत. कोतवालांची यादी तयार आहे. हे पद प्रमोशनने भरणार आहे. यामध्ये एक कनक्ल्युजन होते. कोतवाल हे पद प्रमोशनने भरावे लागते. परंतु शासन जीआरनुसार हे पद सरळ सेवा भरतीने भरण्यात येते. परंतु तसे पाहिले तर हे पद पदोन्नतीचेच असते. आता सरळ सेवा भरतीमध्ये मुलाखती बंदी घातलेली आहे. याबाबत शासनाकडून मार्गदर्शन घेत आहोत. वर्ग-३ चे उमेदवार थेट परीक्षेतूनच निवडण्यात येतात. त्या पदाकरिता ८० टक्के लेखी परीक्षा आणि २० टक्के तोंडी परीक्षा असा रेश्यो आहे. तलाठी यांची ६६७ पदे जिल्ह्यात मंजूर आहेत. १३ टक्के प्रमाणे ६० पदे होत असून आम्ही ५२ पदे भरलेली आहेत. यासंदर्भात मागील आठवड्यात ठरलेली बैठक अधिकारी नसल्यामुळे स्थगित झाली होती. आता एका आठवड्याभरात याबाबत बैठक घेण्यात येईल.

समितीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून समाज कल्याण विभागाला दिल्या जाणाऱ्या निधीची सविस्तर माहिती देण्यात यावी तसेच अनुसूचित जातीतील अधिकारी/कर्मचारी यांना सेवेत पदोन्नती देण्यासंदर्भात निवड समिती स्थापन करण्यात आली आहे काय, असल्यास या निवड समितीमध्ये अनुसूचित जातीच्या अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत? असे विचारले असता जिल्हाधिकारी यांनी याबाबत सांगीतले की, अनुसूचित जातीतील अधिकारी/कर्मचारी यांना सेवेत पदोन्नती देण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. बीओसी/१०७२/जे, दिनांक २३ मे १९७४ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार निवड समिती स्थापन केलेली आहे. सदर पदोन्नतीच्या समितीमध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी हे अनुसूचित जाती या प्रवर्गातील असल्यामुळे त्यांचा समोवश अनुसूचित जातीचा सदस्य म्हणून करण्यात आलेला आहे.

समितीने अनुसूचित जातीच्या उमेदवारांना सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४-२०१५ व माहे मार्च, २०१६ अखरेपर्यंत वर्षनिहाय वर्ग १ ते ४ मधील किती अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच अनुसूचित जातीच्या उमेदवारासाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी १०० बिंदू व ५० बिंदू नामावली नोंदवही ठेवण्यात आली आहे काय, असल्यास केव्हापासून तसेच ती अद्ययावत स्वरुपात आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी सन २०१२-२०१३ मध्ये अव्वल कारकून पदावर ५ कर्मचाऱ्यांना तर मंडल अधिकारी पदावर ४ कर्मचाऱ्यांना, सन २०१३-२०१४ मध्ये मंडल अधिकारी पदावर २ कर्मचाऱ्यांना, सन २०१४-२०१५ मध्ये अव्वल कारकूर पदावर ५ कर्मचाऱ्यांना तर सन २०१५-२०१६ मध्ये लिपिक पदावर २ कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिलेली आहे. आमच्याकडे पदोन्नतीचा अनुशेष नाही. अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखून

ठेवण्यात आलेल्या पदांसाठी १०० बिंदू नामावली नोंदवही सन १९९७ पासून ठेवण्यात आली आहे. तसेच दिनांक २ फेब्रुवारी २०१६ रोजी १०० बिंदू नामावली नोंदवही अद्यावत करून मंजूर करून घेतलेली आहे. मागील तीन महिन्यांपासून हेच काम केले आहे. जानेवारी महिन्यापासून हे काम सुरू आहे तसेच आम्ही बिंदू नामावली तपासल्याशिवाय पदोन्नती आणि सरळसेवा भरती करीत नाही अशी माहिती दिली.

समितीने आपण बिंदू नामावली तपासल्याशिवाय सरळसेवा भरती करीत नाही ही अतिशय चांगली गोष्ट आहे. आम्ही आतापर्यंत पाच-सात जिल्हाधिकारी कार्यालयांना भेटी दिल्या. त्यामध्ये आपल्या कार्यालयाचे काम खूप चांगले आहे. त्याबद्दल समिती जिल्हाधिकाऱ्यांचे अभिनंदन करते, असे नमूद केले.

समितीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांपैकी कोणत्या योजना वैयक्तिक स्वरुपाच्या आहेत, सदर योजनांतर्गत किती वैयक्तिक लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला? असे विचारले असता जिल्हाधिकाऱ्यांनी विशद केले की, संजय गांधी निराधार अनुदान योजनेमध्ये ३३ हजार ४५४ लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमध्ये ५४ हजार ६३० लाभार्थ्यांना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये २२ हजार १७५ लाभार्थ्यांना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती योजनेमध्ये ९१६ लाभार्थ्यांना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती योजनेमध्ये १७८ लाभार्थ्यांना तर राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेमध्ये २९९ लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. आम्ही जवळपास ९७ टक्के योजना आधारकार्डाला लिंक केलेल्या आहेत, अशी माहिती दिली.

समितीने हजारो विद्यार्थ्यांकडे जातीचे प्रमाणपत्र (कास्ट सर्टिफिकेट) नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात शिष्यवृत्तीचा निधी परत गेला आहे, अशा विद्यार्थ्यांचे कास्ट सर्टिफिकेट तातडीने मिळण्यासाठी गावोगावी किंवा काही गावांचा गट करून तहसीलदार यांच्या माध्यमातून कॅम्प लावण्यात यावे व विद्यार्थ्यांना तातडीने कास्ट सर्टिफिकेट देण्याची व्यवस्था करावी. किती विद्यार्थ्यांकडे कास्ट सर्टिफिकेट नाही, याबाबत मुख्याध्यापकांकडून अहवाल मागवून आढावा घ्यावा, असे सुचविले असता जिल्हाधिकारी यांनी असे नमूद केले की, मागील काळामध्ये तहसीलदारांनी एकूण ६१० शिबिर घेतले आहेत. मी जिल्हा परिषदेकडून शिष्यवृत्तीचा निधी परत का गेला याची देखील माहिती घेतो असे आश्वासन दिले त्यावर समितीने शिष्यवृत्ती पासून एकही विद्यार्थी वंचित रहाता कामा नये. या ठिकाणी समाज कल्याण अधिकारी यांना देखील बोलविण्यात यावे. याकरिता टाईम बाऊंड कार्यक्रम आखण्यात यावा. हजारो विद्यार्थ्यांकडे कास्ट सर्टिफिकेट नसल्यामुळे शिष्यवृत्तीची रक्कम परत जाणे योग्य नाही. कास्ट सर्टिफिकेटकरिता लागणारी कागदपत्रे व ती सादर करण्याबाबत खेड्यातील मुलांना अडचणीचे होते. याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय, संबंधित अधिकारी व शाळांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे सुचविले.

समितीने प्रत्येक शाळेमध्ये किती विद्यार्थ्यांकडे कास्ट सर्टिफिकेट नाहीत, याची माहिती घेऊन त्यांना कास्ट सर्टिफिकेट देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. प्रत्येक लाभार्थ्याला शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे, असे सुचविले असता, जिल्हाधिकारी यांनी विद्यार्थ्यांना कास्ट सर्टिफिकेट मिळण्याबाबत समितीच्या सूचनेप्रमाणे शिबीराचे आयोजन करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच कास्ट सर्टिफिकेट नसल्यामुळे विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम परत गेलेली आहे. कास्ट सर्टिफिकेटमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांना कास्ट सर्टिफिकेट देण्याकरिता अशा भागांमध्ये कॅम्प लावण्यात येईल. ती आमची जबाबदारी आहे, असेही आश्वासित केले. तसेच मुख्याध्यापकांकडून विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे फॉर्म भरून घेण्यात आले होते. आमची समिती समाजकल्याण सभापती यांच्या समवेत आयुक्तांकडे गेली होती. आम्ही त्यांना कास्ट सर्टिफिकेटची अट वगळण्याची विनंती केली होती, परंतु ती अट वगळता येत नाही. सेंट्रल गव्हर्नमेंटच्या नॉर्म्समध्ये कास्ट सर्टिफिकेट कंम्पलसरी आहे, असे सांगितले.

समितीने काही शासकीय वसतीगृह भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत. समाज कल्याण विभागाने ३ जागेसंदर्भात आपल्याकडे प्रस्ताव दिलेला आहे. आपल्याकडे बांधकामासाठी पैसा उपलब्ध आहे. इमारतीचे ३, ४ लाख रुपये भाडे आहे. स्वतःचे वसतीगृह बांधण्याबाबत आपली योजना आहे. याकरिता कार्यवाही करण्यात यावी, असे सांगितले असता, जिल्हाधिकारी यांनी यासंदर्भात संबंधित अधिकारी व माझी चर्चा झालेली आहे. ही बाब प्राधान्याने घेण्यात येऊन त्यांच्या मागणीला न्याय देण्यात येईल. त्यांना फ्री ऑफ कॉस्ट देता येईल. असे सांगितले.

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

समितीने सामाजिक न्याय विभागामार्फत विभागीय स्तरावर अनुसूचित जातीकरिता कोणत्या योजना राबविण्यात येतात? व त्यास प्रत्येक वर्षी किती निधी प्राप्त झाला? अशी विचारणा केली असता, सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी एकूण १२ प्रकारच्या योजना राबविण्यात येतात. शिष्यवृत्ती संदर्भात ७, वसतिगृह, रमाई आवास घरकूल योजना, कन्यादान योजना, गटई स्टॉल योजना, अनुसूचित जातीच्या औद्योगिक सहकारी संस्थांना अर्थसहाय्याची योजना, नागरी हक्क संरक्षण, कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण योजना, अनुसूचित जातीच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व उपसाधनांचा पुरवठा योजना, अनुसूचित जाती उप योजना अशा विविध योजना राबविण्यात येतात. त्याशिवाय सात प्रकारचे पुरस्कार विभागामार्फत दिले जातात. सन २०१२-२०१३ मध्ये ३७ कोटी २७ हजार ५८ रुपये इतकी तरतूद झाली होती, असे सांगितले.

समितीने आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य योजनेकरिता किती निधी प्राप्त झाला व एकूण किती प्रस्ताव आले होते? अशी विचारणा केली असता, सहायक आयुक्त यांनी हा विषय समाज

कल्याण विभाग जिल्हापरिषद यांचा आहे. तथापि, मला जी माहिती आहे त्यानुसार ७५ लाख रुपये प्राप्त झाले होते. एकूण १५६ प्रस्ताव आले होते. त्यांना अनुदान दिलेले आहे. राज्य सरकारकडून ७५ लाख आणि केंद्र सरकारकडून ७५ लाख रुपये आले. आता १४ प्रकरणे प्रलंबित आहेत. शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर त्यांना अनुदान देण्यात येईल, असे सांगितले.

समितीने समाज कल्याण विभागाच्या कोणत्या बारा स्कीम आहेत, त्यासाठी किती निधी प्राप्त झाला असे विचारले असता, सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी असे विदित केले की, भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी १९ कोटी, ५३ लाख ४४ हजार इतकी तरतूद प्राप्त झाली होती. त्यापैकी १९ कोटी, ५३ लाख, ४३ हजार खर्च झाले, त्यामध्ये ६००९ लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. दुसरे ३५२ हेड आहे हे देखील स्कॉलरशीपचे हेड आहेत. यामध्ये ३ कोटी, ३२ लाख, ६५ हजार इतकी तरतूद होती. ती रक्कम खर्च झालेली आहे. यामध्ये १ हजार ६६४ लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. एकूण ७ हजार, ६७३ लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. आपण सैनिकी शाळांसाठी देखील तरतूद करतो. व्यावसायिक पाठ्यक्रमामध्ये ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वसतिगृहात किंवा महाविद्यालयाच्या वसतीगृहात (हॉस्टेलमध्ये) प्रवेश न मिळाल्यास अशा विद्यार्थ्यांना आपण अनुक्रमे ७ हजार आणि ५ हजार इतकी रक्कम देतो. यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून अनुदान देण्यात येते. सन २०१५-२०१६ या वर्षात केंद्र सरकारकडून १२ लाख रुपये आणि राज्य सरकारकडून १२ लाख रुपये असे एकूण २४ लाख रुपये खर्च करण्यात आले असून एकूण १४५ लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे, अशी माहिती दिली असता समितीने लाभार्थ्याला एकदम पैसे मिळाल्यामुळे त्याच्याकडून कुठल्याही कारणास्तव ती रक्कम खर्च होऊन त्याला पुढे शैक्षणिक अडचण येऊ शकते किंवा पैसे मिळाल्यावर तो शाळेत देखील येणार नाही व शिष्यवृत्तीची रक्कम एकदम मिळाल्यामुळे विद्यार्थी शाळेत न आल्याची प्रकरणे आहेत काय, अशी विचारणा केली असता सहायक आयुक्त यांनी असे सांगितले की, शिष्यवृत्ती ऑगस्ट महिन्यापासूनच सुरू होते. काही पेंडन्सी असेल तर ती लेखानुदानातून एप्रिल आणि मे महिन्यामध्ये दिली जाते. विद्यार्थी शाळेत न आल्याची प्रकरणे आढळून आली नाही.

समितीने विदर्भामध्ये शिष्यवृत्तीसाठी एकाच विद्यार्थ्याला चार संस्थेमध्ये दाखवून करोडो रुपये हडप केल्याचे प्रकरण उघडकीस आले होते, असे नमूद केले असता, जिल्हाधिकारी यांनी असे प्रकरण घडले होते. त्याची चौकशी झाली होती. त्यासंदर्भात गडचिरोली येथे पहिला एफआयआर दाखल झाला होता असे सांगितले. यासंबंधात सहायक आयुक्त यांनी सामाजिक न्याय विभागामार्फत अनेक योजना राबविण्यात येतात. या विभागाचे बजेट देखील मोठे असते. एसईपीचे बजेट डिस्ट्रीब्यूशन वरून येत असले तरी त्याचे मॉनिटरींग सामाजिक न्याय विभागाकडून केले जाते. उदाहरणादाखल सांगू इच्छितो की, जिल्हा परिषदेकडे कृषी (ॲग्रीकल्चर) विभाग आहे. एकूण विभागापैकी काही निधी जिल्हा परिषदेकडील कृषी विभागाकरिता

जातो. त्याच्या मॉनिटरींगसाठी वर्ग-२ मधील एक अधिकारी आहे. परंतु सामाजिक न्याय विभागाकडे अशी कुठलीही यंत्रणा नाही व तालुका पातळीपर्यंत देखील मॅन पॉवर नाही. बजेट डीस्ट्रीब्युशन व मॉनिटरींग सामाजिक न्याय विभागाकडूनच केले जाते. निधीच्या तुलनेत सामाजिक न्याय विभागाची मॅन पॉवर वाढणे आवश्यक आहे. समितीने शासनाकडे तशी शिफारस करावी, अशी विनंती सामाजिक न्याय विभागामार्फत करीत असल्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.

समितीने माणगांव हे ऐतिहासिक स्थळ आहे. तेथे झालेल्या परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन १९२० मध्ये आले होते व तेथे त्यांनी दोन दिवस मुक्काम केला होता. छत्रपती शाहू महाराज तेथे आले होते. तेथे भव्य स्मारक होऊन त्या भागाचा विकास करण्याची नितांत आवश्यकता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त माणगांवचा चांगला विकास व्हावा व त्याकरिता शासनाने भरीव निधीची तरतूद करून निधी उपलब्ध करून द्यावा, याकरिता समिती देखील ठराव करेल, असे सांगून जिल्हाधिकारी हे चांगले काम करीत असून ते माणगांव येथील स्मारक पूर्ण करण्याची जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडतील असा समितीला विश्वास आहे. चांगले काम केले असल्यामुळे व भविष्यातही त्यांच्याकडून अधिक चांगले काम होईल असा विश्वास व्यक्त केला.

समितीने जिल्हाधिकारी कार्यालय व सहायक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर यांच्या संदर्भात घेतलेल्या बैठकीत झालेल्या सर्व मुद्यांवर आपण आश्वासित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व समितीने केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे, अशी सूचना केली.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

समितीने जिल्हाधिकारी कार्यालयालयातील एकूण रिक्त असलेली ३ पदे शासनाद्वारे भरण्यात आली आहेत काय ? गगनबावडा येथील तहसीलदाराच्या प्रकरणी मॅटने दिलेल्या स्थगनादेशाची सद्यःस्थिती काय आहे, अशी विचारणा केली असता, जिल्हाधिकारी यांनी तीन भागात बॅकलॉग होता. लिपिक-टंकलेखक पदामध्येही होता. ती पदे भरता आली नाही, कारण ती शिपाई संवर्गातील पदोन्नतीकरिता होती. त्यासाठी एसएससी उत्तीर्ण व मराठी आणि इंग्रजी टाईपींग परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ही अर्हता असलेले उमेदवार मिळत नाहीत. दोन पदांचा बॅकलॉक आहे. एकूण शिपाई संवर्गात १७४ पदे आहेत. परंतु, वित्त विभागाने दिनांक १४ जानेवारी २०१६ रोजी आणि महसूल विभागाने दिनांक २१ ऑक्टोबर २०१६ रोजी कळविल्याप्रमाणे एकूण शिपायांच्या मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे कमी करायची आहेत असे कळविले. अशी आम्हाला ४३ पदे कमी करायची आहेत. तलाठी संवर्गात ८ पदांचा बॅकलॉग होता तो पूर्णपणे भरण्यात आलेला आहे. दिनांक ९ जून २०१६ ला सहा आणि १० जानेवारी २०१६ ला दोन पदे भरण्यात आली, असे सांगितले. त्यावर समितीने जी २५ टक्के पदे कमी करायची आहेत ती जसे

कर्मचारी निवृत्त होतील त्याप्रमाणे कमी करणार आहात काय, अशी विचारणा केली असता, जिल्हाधिकाऱ्यांनी शिपाई संवर्गातील २५ टक्के पदे आम्हाला कमी करायची आहेत. एकूण १७४ पदे मंजूर आहेत त्यापैकी २५ टक्के म्हणजे ४३ पदे कमी करायची आहेत, असे सांगितले

समितीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्याबाबत समितीने दिलेल्या आदेशानुसार कोणकोणत्या तारखेला व किती शिबिरांचे आयोजन करण्यात आले? विद्यार्थ्यांना कास्ट सर्टिफिकेट मिळण्याबाबत समितीच्या सूचनेप्रमाणे शिफारशीचे आयोजन केले जाईल, असे आश्वासन दिले होते, याबाबत माहिती द्यावी, असे सूचित केले असता जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात ६ कर्मचाऱ्यांची माहिती अपेक्षित होती, अशी माहिती दिली. मात्र महसूल विभागाच्या प्रधान सचिवांनी हा मुद्दा पूर्णतः वेगळा आहे. समितीला अशी माहिती पाहिजे होती की जे मागासवर्गीय विद्यार्थी असतात त्यांना जातीचे दाखले देण्यासंबंधी शिफारशी केल्या आहेत. महाराजस्व अभियानांतर्गत शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केलेली आहे की, जातीचे दाखले व अन्य दाखले यांची उपलब्धता विद्यार्थ्यांकरिता सुलभ रितीने व्हावी या दृष्टीकोनातून शाळेत जावून त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे काम चालू आहे. कदाचित यांनी ही माहिती आणली नसेल, आपली परवानगी असेल तर ही माहिती मी सादर करतो, असे सांगितले.

समितीने काही मुलांचे जात प्रमाणपत्र नाही, अर्ज नाहीत. या कामात अधिकाऱ्यांनी सहभागी होवून ते पूर्ण करावे. काही शाळांत आपण जात प्रमाणपत्र दिलेले आहेत. यापासून कोणी वंचित राहिले काय याचा आपण आढावा घ्यावा, असे निदेश दिले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, महाराजस्व अभियानाचा तो एक भाग होता. काही स्तरावर असे कॅम्प घेण्यात आले. पण किती कॅम्प घेतले याची माहिती नाही. यासाठी गेल्या वर्षभरात किती कॅम्प घेतले गेले याची मी आपल्याला माहिती देतो.

समितीने कोल्हापूर जिल्ह्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाचे बांधकाम तीन महिन्याच्या आत सुरू करण्याबाबत समितीने केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे? कित्येक वसतीगृहात जागा उपलब्ध होत नाही, पैसे उपलब्ध होत नाहीत तसेच काही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्लॅन मुळे देखील ते यापासून वंचित राहिले आहेत. त्या मिटींगमध्येच हे सर्व काम ८ दिवसात आम्ही चालू करतो असे आश्वासन दिले आहे. पैशाचा प्रश्न नाही. जागेचा प्रश्न फक्त सार्वजनिक बांधकाम विभागाचा (पीडब्ल्यूडीचा) होता, तो प्रश्न ताबडतोब सोडवून तुम्हाला मान्यता मिळवून दिलेली आहे आणि आता तुम्ही त्यावर काम करीत आहात, असे सांगितले असता, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी कोल्हापूर शहरात एक मुलींचे आणि दोन मुलांचे अशी तीन वसतीगृहे आहेत. त्यासाठी आणखी जागा उपलब्ध झालेली नाही. शहरात तीन वसतीगृहे आहेत. जयसिंगपूर येथे मुलींचे वसतीगृह आहे, तेथील जागेची मोजणी झालेली आहे, अशी माहिती दिली.

**अभिप्राय व शिफारशी :**

(१) समितीने जातीचे प्रमाणपत्र (कास्ट सर्टिफिकेट) प्राप्त करून घेण्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याने व सदर प्रमाणपत्र वेळेत सादर न केल्यामुळे त्यांच्यासाठी शासनाकडून प्राप्त झालेला मोठ्या प्रमाणातील शिष्यवृत्तीचा निधी शासनाकडे परत गेल्यामुळे अशा हजारो विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याचा अभिप्राय व्यक्त करून अशी शिफारस केली की, **विद्यार्थ्यांना जाती प्रमाणपत्र तातडीने मिळण्यासाठी शासनाने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना गावोगावी शिबिर (कँम्पस्) आयोजित करून तहसीलदारांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रे वितरित करण्याची व्यवस्था करण्याबाबत आदेश निर्गमित करावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) समितीने कोल्हापूर जिल्ह्यामध्ये काही शासकीय वसतीगृहे भाड्याच्या इमारतींध्ये कार्यरत असून सदर इमारतींचे ३ ते ४ लाख रुपये प्रतिमाह भाडे आहे. समाजकल्याण विभागाने नवीन वसतीगृहांच्या बांधकामासाठी तीन जागांसंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर वसतीगृहांच्या बांधकामासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पैसा/निधी देखील उपलब्ध आहे. तसेच शासनाच्या स्वमालकीचे वसतीगृह बांधण्याबाबत शासनाची योजना आहे. ही बाब विचारात घेता समितीने अशी शिफारस केली की, **शासनाने याबाबतीत प्राधान्याने लक्ष घालून भाड्याच्या इमारतीतील वसतीगृहांऐवजी शासनाच्या मालकीची वसतीगृहे बांधण्याबाबत संबंधितांना तातडीने आदेश निर्गमित करावेत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी अशी, समितीची शिफारस आहे.**

## कोल्हापूर महानगरपालिका

समितीने महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर महानगरपालिकेतील विविध पदांवर उमेदवारांच्या नियुक्त्या करण्यासाठी महानगरपालिकेने सेवा प्रवेश नियम तयार केले आहेत काय, अशी विचारणा केली असता, उपायुक्तांनी नियम व उपविधी यास दिनांक २२ नोव्हेंबर १९७३ मध्ये शासन मान्यताप्राप्त झालेली आहे. विनियमास दिनांक १६ एप्रिल १९७४ रोजी मंजुरी मिळाली आहे. या संदर्भातील माहिती पृष्ठ १३ ते २६ वर दिलेली आहे. सध्या मंजूर विनियमामध्ये आवश्यक त्या सुधारणा करून सुधारित आकृतिबंधासह सेवा प्रवेश नियमाचा मसुदा तयार केला आहे. महासभेच्या मान्यतेनंतर हरकती सूचनांचा विचार करून तो शासनाकडे पाठविणार आहोत. त्यापूर्वी दिनांक १४ मार्च २०१४ रोजी नवीन आकृतीबंधाचा प्रस्ताव प्रधान सचिव,नगर विकास विभाग यांच्याकडे पाठविण्यात आला होता. परंतु शासनाने दिनांक १७ एप्रिल २०१४ रोजी वसई-विरार महानगरपालिकेच्या धर्तीवर सुधारित आकृतीबंध करण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही नवीन आकृतीबंध तयार केलेला आहे. त्यास महासभेची मान्यता घेऊन शासनाकडे पाठवित आहोत, अशी माहिती दिली.

समितीने इतका विलंब का लागला? अशी विचारणा केली असता, उपायुक्तांनी दिनांक १४ मार्च २०१० रोजी शासनाकडे नवीन आकृतीबंध पाठविला होता. परंतु त्यावर शासनाने वसई-विरारच्या धर्तीवर आकृतीबंध करण्यास सांगितले त्याप्रमाणे कार्यवाही केलेली आहे, असे नमूद केले.

समितीने कोल्हापूर महानगरपालिकेतील वर्ग-अ ते वर्ग-ड मधील तांत्रिक व अतांत्रिक अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या पदांची मंजूर संख्या किती आहे, त्यापैकी सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४-२०१५ ते मार्च, २०१६ पर्यंत वर्षनिहाय एकूण किती पदे भरण्यात आली? उक्त मंजूर पदांपैकी वर्ग-अ ते वर्ग-ड मधील किती व कोणकोणती पदे अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत? ही पदे केव्हांपासून रिक्त आहेत? असे विचारले असता, उपायुक्तांनी सन २०१४ मध्ये रोष्टर व्हेरिफाय करण्यात आले. त्यानंतर नोटीफिकेशन काढले. दिनांक ५ जून, २०१० च्या शासन निर्णयानुसार वर्ग 'क' आणि 'ड' मधील पदे भरती प्रक्रियेस एक वर्षाकरिता स्थगिती होती. ती स्थगिती उठल्यानंतर जाहिरात देण्यात आली होती. ती जाहिरात चुकीची असल्यामुळे ती रद्द करून पुन्हा दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ रोजी जाहिरात देण्यात आली होती, अशी माहिती दिली, तसेच उपायुक्तांनी तांत्रिक संवर्गामध्ये सरळसेवा आणि पदोन्नती असे दोन भाग आहेत. सरळसेवेमध्ये गट-अ मध्ये रिक्त पद नाही. गट क मध्ये ४ पदे रिक्त आहेत, गट क मध्ये १६ व गट ड मध्ये १७ अशी एकूण अनुसूचित जातीसांठीची ३७ पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी जाहिरात दिली होती. सन २०१२ मध्ये सुद्धा विविध पदांसाठी जाहिरात दिली होती, परंतु ती जाहिरात रद्द करण्यात आली. त्यानंतर दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ रोजी पुन्हा जाहिरात दिली होती त्याची छाणनी स्क्रुटीनी पूर्ण झालेली आहे व मागील सहा वर्षांपासून ही ३७ पदे रिक्त आहेत, अशी माहिती दिली,

समितीने आपण रोष्टर तपासल्यानंतर जाहिरात देतो तरीही चूक होण्याचे कारण काय, महानगरपालिकेने मागासवर्ग कक्षाकडून रोष्टर तपासून घेतलेले आहे काय? समितीने वर्ग 'क' मधील १६ आणि वर्ग 'ड' मधील १७ पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी २ वर्षे विलंब का लागला? अशी विचारणा केली असता, सहाय्यक आयुक्त मागासवर्गीय कक्ष यांनी पदोन्नती संदर्भातील वर्ग-१ आणि वर्ग-२ चे रोष्टर रिसेन्टली तपासून दिलेले आहे. प्राथमिक तपासणीसाठी ते सामान्य प्रशासन विभागाकडे जाईल. सरळसेवा भरतीसाठीचे रोष्टर आमच्याकडे सादर केले होते, परंतु ते सामान्य प्रशासन विभागाकडे गेले पाहिजे. त्याप्रमाणे त्यांना सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्याबाबत सूचना दिलेली आहे. वर्ग 'क' आणि 'ड' संदर्भातील माहिती समितीला थोड्या वेळात देते, असे त्यांनी अश्वासित केले. तसेच याबाबत आयुक्तांनी सन २००९ मध्ये निवडणूक असल्यामुळे काम जास्त होते त्यामुळे ते राहून गेले. असे सांगितले.

समितीने हे काम देखील महत्त्वाचे आहे. सन २०१० पासून ही पदे रिक्त आहेत. त्यानंतर पदे भरण्यास बंदी आहे असे सांगितले. त्यानंतर रोष्टर तपासण्यात आले व जाहिरात देण्यात आली. त्यामध्ये चूक झाली म्हणून पुन्हा जाहिरात देण्यात आली. सन २०१४ मध्ये रोष्टर अपडेट झाल्यानंतर ही पदे का भरण्यात आली नाहीत? अशी विचारणा केली असता, सहाय्यक आयुक्त परिवहन (A.M.C.) यांनी दिनांक ६ जानेवारी २०१४ रोजी रोष्टर तपासून मिळाले. त्यानंतर आपण भरतीचा कार्यक्रम तयार केला होता. आपण अपंगांच्या भरतीसबंधी एक जाहिरात देखील दिली होती, अशी माहिती दिली.

समितीने सन २०१४ नंतर ही पदे का भरली नाहीत? पदे भरण्यास विलंब झालेला आहे हे मान्य आहे, अशी माहिती आपण दिली आहे. समितीने सहायक अभियंत्याची (तांत्रिक) किती पदे आहेत व किती जागा भरण्यात आल्या आहेत अशी विचारणा केली असता, आयुक्तांनी एकूण ७ पदे आहेत. त्यापैकी २ सरळसेवेची व ५ पदोन्नतीची आहेत. सरळ सेवेच्या २ पदांपैकी अनुसूचित जातीचे १ पद भरलेले आहे, असे सांगितले.

समितीने आम्ही ही पहिली महानगरपालिका पाहिली आहे की, येथे सिस्टिममध्ये काही दिसत नाही. प्रशासनामध्ये एकमत नाही. तसेच आपण नगरसेवकांना सोबत घेऊन काम करीत नाही. सरळसेवेतील तांत्रिक पदे ६७ बाकी आहेत. पदोन्नतीची तांत्रिक पदे १६ बाकी असून सरळ सेवेची भरलेली आहेत. अतांत्रिक पदांचा ३२ अनुशेष आहे. अंतात्रिक पदांचा एकूण अनुशेष ३२ आहे. तांत्रिक पदांचा अनुशेष ५३ आहे. हा अनुशेष २०१० पासून बाकी आहे काय अशी विचारणा केली असता, आयुक्तांनी सन २०१० मधील वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार काही करता आले नाही, असे नमूद केले.

समितीने तांत्रिक पदाच्या ५३ अधिक अतांत्रिक पदाच्या ३२ अशा एकूण ८५ जागा रिक्त आहेत. तसेच त्यामध्ये आकृतीबंध योग्य नाही. सिंगल आयसोलेटेड पोस्टच्या नावाने अनेक पदे क्लब न करता त्याला आरक्षण दिलेले नाही, ही चूक असून ती स्वीकारली पाहिजे, असे सांगितले असता आयुक्तांनी २००८ मध्ये रोष्टर तपासले होते. त्यानंतर त्यांची भरती पूर्ण केली. त्यानंतरचे रोष्टर २०११ मध्ये झाले नसल्याने ते २०१२ मध्ये पाठविले होते. यामध्ये १ वर्ष विलंब झाला होता, असे उत्तर दिले.

समितीने आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज या नगरीमध्ये जन्मले व याच नगरीत आज मागासवर्गीयांना आरक्षणापासून वंचित ठेवले जात असल्याची बाब दुर्दैवी आहे. हा बॅकलॉग २०१० चा असल्याचे आपण सांगितले आणि आता सांगत आहात की, गेल्या वर्षी पदोन्नतीचा बॅकलॉग भरलेला आहे. सन २०१४ नंतर जाहिरात न काढण्याचे कारण काय आहे? असे विचारले असता, सहाय्यक आयुक्तांनी सन २०१४ नंतर ३ जाहिराती दिल्या होत्या. प्रथम अपंग भरतीची जाहिरात दिली होती, असे सांगितले असता, समितीने केवळ अपंग पद भरतीचीच जाहिरात काढण्याचे काय कारण आहे. एकत्रित

जाहिरात द्यायला पाहिजे होती, अशी विचारणा केल्यावर सहाय्यक आयुक्तांनी अपंग भरतीचा जास्त बॅकलॉग असल्यामुळे त्यांची जाहिरात अगोदर दिली होती. एका वर्षात तीन टप्प्यामध्ये जाहिरात दिली होती, असे सांगितले असता समितीने सर्व जाहिराती एकाच वेळेस का दिल्या नाहीत? यामागे काय उद्देश होता. ही नगरपालिका नसून महानगरपालिका आहे, हे आपण लक्षात घ्यावे. अपुरा अनुशेष निदर्शनास आला, समितीला दिशाभूल करणारी कारणे सांगण्यात आली. वेळेत पद भरती न केल्यामुळे सन २०१० पासून अनुसूचित जातीच्या ८५ पदांचा बॅकलॉग आहे. यासंदर्भात मुंबई येथे सचिवांची साक्ष घेण्यात येईल. यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्यात यावी, असे निदेश समितीने दिले. सदर निदेशाच्या अनुषंगाने सहाय्यक आयुक्तांनी यामागे कोणताही हेतू नव्हता. दिनांक ०३ जुलै, २०१४ रोजी अपंग भरतीची जाहिरात दिली होती, अशी माहिती दिली. त्यावर समितीने आपण कोणत्या वर्तमानपत्रात जाहिरात दिली? किती पदांचा बॅकलॉग होता? अशी विचारणा केली असता, सहाय्यक आयुक्तांनी पुढारी आणि महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती त्यात एकूण २२ पदे होती त्यामध्ये काही पदे अनुसूचित जातीसाठी राखीव होती, असे सांगितले त्यावर समितीने आपण २२ पदांसाठी जाहिरात दिली त्यामध्ये कॅटेगरीवाईज किती पदांचा अनुशेष भरावयाचा आहे याची माहिती द्यावयास पाहिजे होती, ती दिलेली नाही. आपण ज्यावेळी जाहिरात देतो त्यावेळी अमुक जातीसाठी इतकी पदे राखीव आहेत, अपंगासाठी इतकी पदे राखीव आहेत असा उल्लेख करतो. आपण २२ पदे ओपनसाठी दिली. २२ पदांपैकी अनुसूचित जातीसाठी किती आरक्षित होती? आपण २२ पदे भरली का असे विचारले असता आपण हो म्हणून सांगितले. आपणास राखीव जागांकरिता उमेदवार मिळाले नाहीत म्हणून आपण ओपनमधले भरले काय? अजा/विजाभजसाठी जाहिरात दिली होती काय? आपण जाहिरातीमध्ये सर्व जातींचा उल्लेख करतो काय? पहिले प्राधान्य अनुसूचित जातीसाठी असते, जर जाहिरात देऊन अनुसूचित जातीचा उमेदवार मिळाला नाही तर पुन्हा जाहिरात देतो त्यावेळीही नाही मिळाला तर तो क्रम खाली जातो, असे सांगितले असता, आयुक्तांनी २२ पदे ओपनसाठी नव्हती, असे जाहिरातमध्ये दिलेले आहे. कनिष्ठ लिपिकाची दोन पदे होती त्यापैकी १ पद इमावसाठी होते. आम्ही जेव्हा परीक्षा घेतली तेव्हा टॉपरमध्ये भटक्या जमातीचा उमेदवार होता त्यामुळे त्याला नियुक्ती दिलेली आहे. एक पद भरावयाचे होते. ज्या कॅटेगरीमधील असेल त्या कॅटेगरीमधून घेतो. आम्ही अपंग आयुक्तालयाकडून गायडन्स मागितले होते त्यांनी सांगितले की, जे टॉपर आहेत त्यांना त्यांच्या जातीनिहाय वर्गाप्रमाणे सामावून घ्यावे. यामध्ये एस.सी.चा टॉपर नव्हता, असे सांगितले.

समितीने आता २०१६ सुरू आहे. आपणाकडे २०१४ मध्ये रोष्टर तपासून आले. त्यास दोन वर्षे झाली. त्या दोन वर्षांमध्ये जाहिरात दिली काय? रोष्टर तपासून आल्यानंतर लगेच कार्यवाही झाली पाहिजे होती. आपण सन २०१० पासून मागासवर्गीयांची पदे भरण्याकडे दुर्लक्ष केलेले आहे, हलगर्जीपणा केलेला आहे हे निदर्शनास आलेले आहे. त्यामागील कारणे काहीही असू द्या. यास जे कोणी जबाबदार असतील त्यांना शो-कॉज नोटीस द्यावी असे निदेश दिले. तसेच मागासवर्ग कक्षाकडून कोणते अभिप्राय देण्यात आलेले

आहेत? अशी विचारणा केली असता, सहाय्यक आयुक्त महानगरपालिका यांनी रोष्टर तपासून आले त्याप्रमाणे जाहिरात दिलेली आहे, असे समितीस सांगितले.

उपायुक्तांनी मागासवर्ग कक्षाकडून आलेले अभिप्राय समितीस वाचून दाखवितो असे सांगून रोष्टर तपासणीच्या वेळी सर्व कर्मचाऱ्यांच्या मान्यता पहावयास उपलब्ध झालेल्या नाहीत. रोष्टर तपासणीकरिता वेळोवेळी उपरोक्त तारखांना सदर कार्यालयाचे प्रतिनिधी हजर झाले असताना त्यांना वरील तक्रारदारांचे अनुषंगाने रोष्टरमध्ये नमूद असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश सादर करणेच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. असे असतानाही सदर कार्यालयाने सर्व कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश सादर केलेले नाहीत. ही बाब प्रशासकीयदृष्टया उचित नाही. त्यामुळे रोष्टर तयार करणेबाबत सद्यःस्थितीत कार्यालयातील कागदपत्रे दाखल करणेबाबत टाळाटाळ व विलंब झाला आहे, त्यानुसार प्रशासन अधिकाऱ्यांनी संबंधितांवर कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. ज्या कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश प्राप्त झाले आहेत. त्यांची माहिती सविस्तर प्रत्येक संवर्गामध्ये दर्शविलेली आहे. तसेच ज्याचे नियुक्ती आदेश पहावयास मिळाले नाहीत त्याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांचे रोष्टरवरील स्वाक्षरीस अनुसरून रोष्टर तपासणी करण्यात आलेली आहे त्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित कार्यालय प्रमुख आणि नियुक्ती प्राधिकारी जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी, अशी माहिती दिली.

समितीने आपण त्याप्रमाणे कारवाई केली काय, त्यावेळी आपण होता काय? अशी विचारणा केली असता, आयुक्तांनी संबंधितांना शो-कॉज नोटीस देऊन कारवाई करतो, असे आश्वासन दिले.

समितीने अनुसूचित जातीच्या उमेदवारांना सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४-२०१५ पर्यंत वर्षनिहाय वर्ग अ ते ड मधील किती अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे, पदोन्नती दिली असल्यास कोणत्या पदावर देण्यात आली, नसल्यास त्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा केली असता उपायुक्तांनी वर्ग २ ते वर्ग ४ मधील अनुसूचित जातीच्या अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. कनिष्ठ लिपिक संवर्गातील पदांसाठी निवड समितीची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापि, मान्यताप्राप्त संघटनेकडून ही बाब न्याय प्रविष्ठ झाली आहे. पदोन्नतीद्वारे पदे भरण्यात येतात अशी माहिती दिली.

समितीने महानगरपालिकेच्या ५९ शाळेतील बॅकलॉग भरलेला आहे काय, तसेच एकूण मुख्याध्यापक किती आहेत? मुख्याध्यापक पदांचा बॅकलॉग किती आहे अशी विचारणा केली असता प्रशासकीय अधिकाऱ्यांनी अशी माहिती दिली की, एकूण मुख्याध्यापकांची संख्या २१ आहे. मुख्याध्यापकांची अनुसूचित जातीची आवश्यक पदे ३ आहेत. परंतु कार्यरत पदे ४ आहेत. शिक्षकांची ३६८ पदे मंजूर आहेत. दिनांक ३० सप्टेंबर २०१४ च्या संच मान्यतेनुसार ३७ पदे रिक्त आहेत. अनुसूचित जातीची ४८ पदे भरणे आवश्यक असून ४० पदे कार्यरत आहेत. त्यामध्ये ८ पदांचा अनुशेष आहे. तथापि, दिनांक २ मे २०१२

च्या निर्णयानुसार शिक्षक भरती बंद असल्यामुळे अनुशेषानुसार रिक्त पदांचा आढावा प्राथमिक संचालक यांना दिलेला आहे आणि राज्यस्तरावरून शिक्षक भरती समायोजन प्रक्रिया सुरू आहे. अतिरिक्त शिक्षकांचा आढावा घेतल्यानंतर समायोजन प्रक्रिया पूर्ण होईल. शिक्षण पर्यवेक्षकाची ४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १ पद कार्यरत असून ३ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांच्या संदर्भात व प्रमोशनच्या फाईलवर उपायुक्त यांची स्वाक्षरी झालेली आहे. त्यावर दोन, तीन दिवसांमध्ये आयुक्त साहेबांची स्वाक्षरी होईल.ही ३ पदे बढतीने भरणार आहोत. सेवाज्येष्ठता व गुणवत्ता अनुषंगाने २ अनुसूचित जातींची पदे पात्र होतात व १ पद ओबीसीसाठी पात्र होते आणि १ ओपनचे पद भरलेले आहे.

समितीने महानगरपालिकेच्या ५९ शाळांमध्ये एकूण लिपिकांची संख्या किती आहे व सर्व शाळांचे रोष्टर तपासून झाले आहे काय? सदरहू रोष्टर कोणत्या वर्षीचे आहे? पद भरती व्हावी म्हणून रोष्टर तपासावे, असा नियम आहे काय? अशी विचारणा केली असता, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी रोष्टर तपासण्यासाठी आम्हाला ११ एप्रिल ही तारीख देण्यात आली होती. त्यासंदर्भातील पत्र १२ एप्रिल रोजी प्राप्त झाले. आम्ही पुन्हा त्यांच्याशी पत्रव्यवहार केल्यावर चार, पाच दिवसांत तारीख देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. हे रोष्टर चालू वर्षीचे आहे. परंतु २००९ पासून रोष्टर तपासले नाही, तसेच त्यानंतर पद भरती देखील झालेली नाही. या ठिकाणी माझ्यापूर्वी श्री. किल्लेदार हे काम पहात होते. परंतु त्यांची गुहागर येथे बदली झालेली आहे. सन २००९ नंतर ज्या ज्या अधिकाऱ्यांकडून अशा चुका झालेल्या आहेत व त्या सर्व अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल, असे समितीस आश्वासीत केले.

समितीने महानगरपालिकेमध्ये कसे काम चालले आहे. उपायुक्त, अतिरिक्त आयुक्त हे किती वर्षापासून येथे आहेत. याबाबतची माहिती घेणे आपले काम नाही काय? निष्काळजीपणाने कामकाज करणे, योग्य नाही. जिल्हाधिकारी कार्यालयात चांगल्या प्रकारे काम करण्यात आले त्याबद्दल समितीने जिल्हाधिकारी आणि त्यांच्या टीमचा सत्कार केला. जर कोणी चांगले काम करीत असेल तर समिती त्यांचा सत्कार करते हे आपण विसरू नये. आम्ही इतके जिल्हे फिरलो परंतु आपल्या इतके निकृष्ट दर्जाचे काम आम्हाला कोठेही पहावयास मिळालेले नाही हे समितीस येथे खेदाने नमूद करावेसे वाटते असे मत व्यक्त केले. समितीने कोल्हापूर शहरात खाजगी अनुदानित शाळा किती आहेत? असे विचारले असता, प्रशासन अधिकारी यांनी कोल्हापूर शहरात ६५ खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा आहेत, अशी माहिती दिली.

समितीने या खाजगी अनुदानित शाळांतील अनुसूचित जातीसाठी राखीव असलेली पदे भरण्यात आली आहेत काय, तसेच त्यात या पदांचा अनुशेष आहे काय, अशी विचारणा केली असता, प्रशासन अधिकारी यांनी माझ्याकडे जे रजिस्टर भरण्यासाठी आले होते त्यानुसार भरलेली आहेत. आता माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही थोड्या वेळात ही माहिती सादर करते, असे सांगितले.

समितीने या ६५ खाजगी अनुदानित शाळांनी रोष्टर तपासणी केली आहे काय? खाजगी अनुदानित शाळांनी रोष्टर तपासून घेतले किंवा कसे याची माहिती मागासवर्ग कक्षाकडून घेण्यात यावी. खाजगी अनुदानित शाळांची यादी आणि अनुशेष भरला किंवा कसे याची माहिती समितीला द्यावी. असे सूचित केले असता, सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष यांनी काही संस्था रोष्टर तपासणी करून घेतात तर काही संस्था करीत नाहीत. आम्ही रोष्टर तपासल्याशिवाय पदोन्नती दिलेली नाही. ही माहिती समितीला सादर करण्यात येईल. असे सांगितले.

समितीने महानगरपालिकांच्या शाळांचे रोष्टर तपासले आहे काय? अशी विचारणा केली असता सहाय्यक अधीक्षक (प्राथमिक शिक्षण मंडळ) यांनी एकूण ५९ शाळा आहेत. शिक्षकांची एकूण ३६८ पदे असून त्यापैकी ३३१ पदे कार्यरत आहेत तर ३७ पदे रिक्त आहेत. ३६८ पदांपैकी अनुसूचित जातीकरिता ४८ पदे आरक्षित आहेत त्यापैकी ४० कार्यरत आहेत, ८ पदांचा अनुशेष आहे. समायोजन प्रक्रिया सुरू आहे. लिपिकाची ९ पदे आहेत, एकही पद रिक्त नाही, अनुसूचित जातीकरिता २ पदे राखीव आहेत, दोन्ही पदे भरलेली आहेत. शिपायाची १०३ पदे असून सर्व पदे भरलेली आहेत. अनुसूचित जातीसाठी १३ पदे राखीव आहेत त्यापैकी १२ पदे भरलेली आहेत, एका पदाचा अनुशेष आहे. महानगरपालिकेने ठराव करून निर्णय घेतलेला आहे की, कोणत्याही कारणाने पदे रिक्त होतील ती व्यपगत समजण्यात येतील, अशी माहिती दिली.

समितीने आपणास असे करता येणार नाही. आपणास ते एक पद भरावे लागेल. आपण ओपनमधील एक पद कमी करून अनुसूचित जातीचे पद भरावे. आपण अनुशेष शिल्लक असताना भरती बंद कशी केली अशी विचारणा केली असता, सहाय्यक अधीक्षक (प्राथमिक शिक्षण मंडळ) यांनी जसजसे कर्मचारी सेवानिवृत्त होतील ती पदे व्यपगत समजण्यात येतील असा निर्णय झालेला आहे, अशी माहिती दिली.

समितीने महानगरपालिकेच्या मालकीच्या भाजी मार्केट व अन्य वसाहतीमध्ये अनुसूचित जातींच्या लोकांना गाळ्यांचे वाटप करण्यात आले आहे काय अशी विचारणा केली असता उपायुक्तांनी महानगरपालिकेचे एकूण २३०० मटन मार्केटसह इतर व्यवसायाचे दुकाने व गाळे असून या मार्केटच्या संपूर्ण इमारती ह्या जुन्या आहेत व सदरचे गाळ गेली १५ ते २५ वर्षापासून भाड्याने दिलेले आहेत. यामध्ये १९८ गाळे अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील लोकांना दिलेले आहेत. जसे शिल्लक व नवीन गाळे उपलब्ध होतील त्यामध्ये निविदा प्रक्रिया राबविताना अनुसूचित जातीसाठी ८ दुकान गाळेकरिता आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्यापैकी ४ दुकानगाळे अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील लोकांसाठी दिलेले आहेत व ४ दुकानगाळ्यांकरिता निविदा प्राप्त झाल्या नाहीत. त्यानंतर दुकानगाळयाबाबत निविदा काढण्यात आलेली नाही, अशी माहिती दिली असता समितीने १३ टक्के प्रमाणे २९९ गाळे येतात आणि आपण १९८ गाळे दिलेले आहेत असे सांगत आहात म्हणजे १०० गाळे कमी दिलेले आहेत. हा अनुशेष भरावा असे आपणास वाटले नाही काय,

१०० चा अनुशेष असताना आपण ८ गाळ्यांसाठी निविदा काढली ते सर्व गाळे अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी का आरक्षित ठेवले नाहीत, अशी विचारणा केली असता. उपायुक्तांनी हे गाळे १५-२० वर्षापूर्वी दिलेले आहेत. त्यावेळी फॉलोअप होत नव्हता. सन २०१२ मध्ये ८ गाळ्यांसाठी निविदा काढण्यात आली. त्यावेळी ५० टक्के आरक्षण ठेवले होते. हे गाळे १५-२० वर्षापूर्वी दिले असल्यामुळे ते अजून रिक्त झालेले नाहीत. ८ गाळ्यांसाठी निविदा काढण्यात आली होती त्यापैकी ४ गाळे अनुसूचित जातीसाठी राखीव ठेवण्यात आले होते. उर्वरित चार गाळे रिक्त आहेत, अशी माहिती दिली.

## विभागीय सचिवांची साक्ष

समितीने अनुसूचित जातीच्या सरळसेवेने भरावयाच्या तांत्रिक संवर्गातील वर्ग-३ व वर्ग-४ ची ४१ पदे कोणत्या वर्षापासून रिक्त आहेत तसेच अद्यापपर्यंत जाहिरात प्रसिद्ध न करण्याची कारणे काय आहेत व या पदांची भरती करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा केली असता. उप आयुक्तांनी महानगरपालिकेकडे जी वर्ग-३ आणि वर्ग-४ ची पदे आहेत त्याचे रोष्टर डिसेंबर, २०१४ मध्ये मंजूर करण्यात आले आहे. वर्ग-१ आणि वर्ग-२ चे रोष्टर नोव्हेंबर, २०१६ मध्ये मंजूर झालेले आहे. महापालिकेकडे वर्ग-१ ते वर्ग-४ पर्यंतचे जे रोष्टर आहे ते सर्व मंजूर झालेले आहे. अनुशेषासंदर्भात सरळसेवा आणि पदोन्नती असे दोन प्रकार आहेत. तांत्रिक सेवा व अतांत्रिक सेवा अशा दोन प्रकारच्या सेवा असतात. सरळसेवा तांत्रिकमध्ये ४२ पदांचा अनुशेष होता. त्यातील एक पद आम्ही भरले आणि सद्यःस्थितीत ४१ पदांचा अनुशेष आहे. पदोन्नतीमध्ये तांत्रिक अनुशेष १८ पदांचा होता त्यापैकी एक पद भरले आहे. सरळसेवा अतांत्रिक पदांमध्ये ३२ पदांचा अनुशेष होता, त्यातील ७ पदे आम्ही जाहिरात देऊन भरलेली आहेत आणि पदोन्नती अतांत्रिक मध्ये १४ पदांचा अनुशेष होता, त्यातील १३ पदे आम्ही भरलेली आहेत. एकूण १०६ पदांचा अनुशेष होता त्यापैकी २२ पदे भरलेली आहेत, सध्या ८४ पदांचा अनुशेष शिल्लक आहे. त्यामध्ये सरळसेवेच्या प्रक्रियेने भरावयाची जी पदे आहेत त्याचे रोष्टर मंजूर आहे. ही पदे भरण्याची कार्यवाही एका वर्षात आम्ही करु, असे त्यांनी समितीस आश्वासन दिले.

समितीने एक वर्ष कशासाठी पाहिजे. रोष्टर मंजूर आहे, तर लगेच प्रक्रिया सुरू करा. यात काय घडले हे तुम्हाला आधी पाहायला हवे आणि तसेच हा बॅकलॉग का आणला आहे हेही पाहिले पाहिजे. यासाठी एक वर्षाचा कालावधी जास्त वाटतो. सरळसेवेची एकूण किती पदे आहेत? अशी विचारणा केली असता, उपायुक्तांनी अनुशेषाच्या ज्या काही जागा आहेत त्या आपण पूर्ण करून घेऊ, त्यात काही अडचण येणार नाही. सर्व स्तरावरील अनुशेष आपण भरुन घेऊ शकतो. त्याला काहीच अडचण नाही कारण आमचे रोष्टरही मंजूर आहे, रिक्त जागांची ही सर्व माहिती आहे. यासाठी आम्ही सरळसेवेची परीक्षा घेऊ शकतो. सरळसेवेच्या पदांत ४१ तांत्रिक पदे रिक्त आहेत. मी एक वर्ष यासाठी सांगितले की, आमच्याकडील कॅडर्स मोठ्या संख्येने आहेत, अशी माहिती दिली.

समितीने आम्ही समिती नेमून मागच्या वेळीही एक वर्षाचा कालावधी दिला होता, पण आता एक वर्ष हा कालावधी जास्त होत आहे. उद्या पासून सुरू करा. प्रक्रिया सुरू करायला किती वेळ लागतो, याबाबतची तुमची काय प्रतिक्रिया आहे? या संदर्भात आपण समितीला बॅकलॉगसहित अहवाल सादर करावा, असे सुचित केले असता, उपायुक्तांनी रिक्त पदांची संख्या निर्धारित करून त्याला प्रवर्गनिहाय निश्चिती करून त्याची जाहिरात प्रसिद्ध करावी लागते. जाहिरात काढल्यानंतर त्याचे ऑनलाईन ॲप्लीकेशन येतात. ते आल्यानंतर आपल्याला प्रश्नपत्रिका सेट करावी लागते आणि परीक्षेची प्रक्रिया झाल्यानंतर आपल्याला निवड करावी लागते. अनुशेषाची ८ पदे आम्ही भरलेली आहेत आणि उरलेली पदे आम्ही लवकर भरुन घेऊ. सहा महिन्यात आम्ही ही सर्व प्रक्रिया पूर्ण करून घेऊ, असे समितीला आश्वासीत केले.

समितीने अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी महानगरपालिकेने प्रोत्साहनपर कोणती कार्यवाही केली आहे व कार्यवाही म्हणजे प्रबोधनपर काय केले? या संवर्गातील पदावरील पदोन्नतीसाठी कर्मचारी उपलब्ध झाले नाही असे म्हटले आहे, याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे, असे सूचित केले असता आयुक्तांनी अनुसूचित जातीच्या पदोन्नतीच्या पदांवर त्याच प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची पदोन्नती करावी लागते मात्र या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे ही पदे भरता आली नाहीत. उदाहरणार्थ मिस्त्री या कॅडरमधील पद हे पदोन्नतीनेच भरले जाते. या पदावरील पदोन्नतीसाठी आपण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांमधून ज्यांच्याकडे आयटीआयचे प्रमाणपत्र आहे असे उमेदवार घेतो. परंतु आपल्याला आयटीआय प्रमाणपत्र असलेले मागासवर्गीय पात्र कर्मचारी उपलब्ध न झाल्यामुळे हा अनुशेष भरता आला नाही. या प्रकारची सुतार, तांडेल अशी भरपूर पदे आहेत जी आपल्याला पात्र कर्मचारी न मिळाल्यामुळे भरता आली नाहीत, असे सांगितले असता समितीने संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून उमेदवार मिळत नाहीत काय व याला काही पर्याय आहे काय? मिस्त्री या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र कर्मचारी उपलब्ध झाला नाही कारण त्याच्याकडे आयटीआय चे प्रमाणपत्र नाही, असे असेल तर त्याची नियुक्ती करताना या संवर्गात विना प्रमाणपत्र नियुक्ती कशी केली, पदोन्नती देताना त्याच्याकडे प्रमाणपत्र कसे मिळत नाही अशी विचारणा केली असता, आयुक्तांनी आमच्या आस्थापनेवर जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांनाच केवळ पदोन्नती देता येते. पदोन्नतीची जी पदे भरावयाची असतात ती त्याच ठराविक कॅडरमधून भरणे आवश्यक असते व अशा स्पेसिफाईड कॅडरमधून उमेदवार उपलब्ध न झाल्यास ही पदे भरणे शक्य होत नाही. ते प्रथम कामावर रुजू होताना कामगार म्हणून सरळसेवेने भरती होतात. त्यावेळी प्रमाणपत्राची आवश्यकता नसते. तद्नंतर जे कर्मचारी उच्च अर्हता धारण करतात त्यांना आपण पदोन्नतीसाठी विचारात घेतो. पदोन्नती द्यावयाची असते त्यावेळी आयटीआय प्रमाणपत्र असणाऱ्यांनाच आपण पदोन्नतीसाठी गृहित धरतो, अशी माहिती दिली.

समितीने अतांत्रिक संवर्गातील अनुसूचित जातीची सरळसेवेने भरावयाची एकूण २५ पदे कोणत्या वर्षापासून भरावयाची आहेत? या प्रश्नाच्या अनुषंगाने अधिक माहिती देण्यात यावी, असे निदेशित केले असता, आयुक्तांनी अनुशेषाचा वर्षनिहाय आढावा आपण घेतला आहे. त्यानुसार सन २०१० मध्ये १५, २०११ मध्ये १४, २०१२ मध्ये ११, २०१३ मध्ये १०, २०१४ मध्ये १२, २०१५ मध्ये १५ व २०१६ मध्ये ७ असा आज रोजीपर्यंत एकूण ८४ पदांचा अनुशेष आहे. मागील वर्षात एकूण २२ पदांचा बॅकलॉग भरला आहे. उर्वरित पदांपैकी जी पदे भरणे शक्य असेल त्याबाबत पुढील ६ महिन्यात कार्यवाही करण्यात येईल, असे समितीस आश्वासन दिले.

समितीने मागील दौऱ्यामध्ये कोल्हापूर महानगरपालिकेमधील परिस्थिती आमच्या निदर्शनास आली असून ती अत्यंत गंभीर आहे. त्या अनुषंगाने तेथील सिस्टीममध्ये योग्य त्या सुधारणा करण्यात याव्यात. शाहु महाराजांच्या जिल्ह्यात या सर्व गोष्टी घडत आहेत. ज्या पद्धतीने तेथे या गोष्टी राबविल्या जातात त्यामुळे मागासवर्गीयांची कुचंबना होत आहे. आपणांस नियमबाहय काही करण्याचा सल्ला आम्ही देत नाही, परंतु तेथे काही गोष्टी मागासवर्गीयांना वंचित ठेऊन झालेल्या आहेत. त्याबाबत आपण स्वतः लक्ष घालावे. येथे एकूण ८४ पदांचा बॅकलॉग असून मागील वर्षी केवळ १०-१२ पदे भरण्यात आली आहेत. पद भरतीबाबत कार्यवाही करून तसा अहवाल समितीस ६ महिन्यांमध्ये सादर करण्यात यावा. अन्यथा समितीस पुन्हा आपल्या महानगरपालिकेस भेट द्यावी लागेल. असे मत व्यक्त केले.

समितीने नागरी दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत महानगरपालिकेने कोणकोणती कामे हाती घेतली आहेत, त्यासाठी २०१६-१७ या वर्षी किती निधी प्राप्त झाला व त्यापैकी किती निधी खर्च झाला व किती निधी शिल्लक आहे? काही ठिकाणी आम्हाला असे आढळून आले की, जेथे दलित वस्ती आहे तेथे दलितांसाठी कामे केली आहेत. परंतु काही ठिकाणी दलित वस्ती कोठे तरी रस्त्याच्या शेवटच्या टोकाला असते व त्यासाठीचे रस्ते सवर्णांच्या वसाहतीमधून गेलेले आहेत, याचा अर्थ दलितांसाठी जी कामे केली जातात त्याचा उपयोग इतरांसाठीच होतो. एखाद्या ठिकाणी रहात असलेल्या अनुसूचित जातीच्या रहिवाशांबाबतचे प्रमाणपत्र मिळाले म्हणजे तेथे सर्व काही योग्य होते असा त्याचा अर्थ होत नाही. आम्ही त्या ठिकाणी काही लोकांकडे झालेल्या कामांबाबत विचारणा केली असता, त्यांनी तेथे रस्ते झाले नसल्याबाबत उत्तरे दिली, त्यामुळे याबाबत लक्ष घालण्यात यावे, असे निदेश दिले. त्यावर आयुक्तांनी याबाबतची वर्षनिहाय पूरक माहिती देण्यात आली आहे. मनपाला २०१६-१७ मध्ये एकूण १०० लक्ष अनुदान प्राप्त झाले व त्यातून आम्ही २८ कामे प्रपोज केली आहेत. ती प्रशासकीय मान्यतेसाठी दिनांक २७.०२.२०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आली आहेत. प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर तात्काळ निविदा काढून कामे सुरू करण्यात येतील. याबाबत शासन निर्णयामध्ये निर्देश देण्यात आले आहेत की, मागासवर्गीयांसाठी आरक्षित असणाऱ्या प्रभागांमध्ये किंवा ज्या वस्त्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त मागासवर्गीयांची वस्ती आहे

अशा वसाहतींमध्येच ही कामे झाली पाहिजेत. तसे प्रमाणपत्र आम्ही शहर अभियंता यांच्याकडून घेतल्यानंतरच पुढील कामे केली जातात, अशी माहिती दिली.

समितीने महानगरपालिकेच्या स्वनिधीतून मागासवर्गीय लोकांसाठी सुखसोयी पुरविण्यासाठी सन २०१४-१५ व सन २०१६-१७ मध्ये प्रत्यक्ष खर्च संबंधित कार्यान्वयन विभागाकडून कमी होण्याची कारणे काय आहेत? याबाबतची कामे झाली काय? व ५ टक्के तुम्हाला विशेष फंडामधून काढावयाचे होते. याअंतर्गत यापूर्वी मिळालेली रक्कम खर्च झाली काय, २०१५-१६ चे पैसे खर्च झाले काय? अशी विचारणा केली असता, आयुक्तांनी स्वनिधीमध्ये मागील खर्च वजा जाता ५ टक्के निधीची तरतूद करणे आवश्यक असते. सन २०१४-१५ मध्ये आपल्याला ५ टक्के येणारी रक्कम होती २ कोटी २९ लाख रुपये. त्याच्या अगेन्स्ट आपल्याकडे २ कोटी ३६ लाख रुपये एवढी तरतूद केली होती. २०१५-१६ मध्ये २ कोटी ३३ लाख रुपयांच्या अगेन्स्ट १ कोटी ३ लाख रुपये तरतूद केली होती. मागील वर्षी जी तरतूद कमी झाली होती त्याचा अनुशेष या वर्षी भरुन काढला आहे. ॲक्चुअल खर्च खूप कमी दिसतो कारण काही महत्त्वाच्या स्किम्स् किंवा इतर जे खर्च होते जसे की वेतन, पेन्शन यावर आमचा खर्च झाला आणि ॲक्चुअल बजेटमध्ये आम्हाला तरतुद करता आली नाही. खर्च झालेली रक्कम कमी दिसते, कारण महानगरपालिकेला जेवढे आर्थिक उत्पन्न अपेक्षित होते त्या प्रमाणात कमी उत्पन्न प्राप्त झाले आहे, असे सांगितले.

समितीने ही अमाउंट कमी अधिक होऊ शकते असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय, असे असेल तर किती होऊ शकते ? सन २०१५-१६ ला मागासवर्गीयांसाठी सुमारे २ कोटी रुपये देणे आवश्यक आहे. त्यापैकी तुम्ही किती रकमेची कामे केली? २०१५-१६ मध्ये तुम्ही १ कोटी रुपयांची तरतूद केली व त्याच्या अगेन्स्ट ९७ लाख रुपये खर्च केले, परंतु यासाठी आपल्याला एकूण किती निधी प्राप्त झाला? साडे तीन कोटींपैकी कट किती करण्यात आले, की पूर्ण अमाउंट देण्यात आली आहे? असे विचारले असता, आयुक्तांनी हा खर्च काढण्याची प्रोसेस सुरू आहे. सन २०१३-१४ पासून एकूण ६८ कामे करावयाची होती. त्यापैकी ४४ कामे २०१६-१७ पर्यंत पूर्ण झाली आहेत तर २४ कामे सुरू आहेत. यासाठी मागील दोन वर्षात कमी अनुदान होते ते पुढील दोन वर्षात वाढवून घेतले. माननीय आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे पुढील दोन वर्षांमध्ये जास्त तरतूद करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच सन २०१५-१६ मध्ये १ कोटी रुपयांची तरतूद केली होती. त्याच्या अगेन्स्ट ९७ लाख रुपयांचा खर्च केला आहे. ५ टक्क्यांप्रमाणे २०१५-१६ ची रक्कम काढली तर ती २ कोटी ३३ लाख रुपये एवढी होते. त्याच्या अगेन्स्ट महानगरपालिकेने १ कोटी ३ लाख रुपयांची तरतूद केली होती. त्यावेळी ५ टक्के तरतूद करणे आवश्यक होती त्यापेक्षा कमी तरतूद झाली आहे. परंतु जेवढी तरतूद केली त्यामधून आपण ९७ लाख रुपये खर्च केला. त्याचा अनुशेष भरुन काढण्यासाठी सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये साडे तीन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, असे सांगीतले.

समितीने सन २०१६-१७ ला साडे तीन कोटी रुपये घेतले असतील तर त्या साडे तीन कोटींची कामे झाली काय? तुम्हाला जेवढे पैसे मिळावयास हवे होते तेवढे मिळाले. त्याच्या ५ टक्के तुम्ही वेगळे काढावयास हवे होते. ते तुम्ही काढले नाहीत. त्यामुळे मागासवर्गीयांना तुम्ही कमी पैसे दिले आता तुम्ही ५ टक्क्यांच्या वर जाऊन मागील बॅकलॉग भरून काढत आहात.त परंतु ही अमाउंट खर्ची पडली का ? ही कामे किती किंमतीची आहेत? अशी विचारणा केली असता, आयुक्तांनी यामध्ये २७ कामे प्रस्तावित केली असून त्यापैकी ५ कामे पूर्ण झाली आहेत तर २२ कामे प्रगतीपथावर आहेत. यामधील सव्वा तीन कोटी रुपयांची कामे प्रगतीपथावर आहेत.त यामध्ये ईपीएफ चा प्रश्न होता. कंत्राटदारांना ईपीएफ रजिस्ट्रेशन असणे अनिवार्य करण्यात आले होते. त्यामुळे त्यांनी निविदा भरल्या नाहीत व ही कामे प्रलंबित राहिली. हा प्रश्न आता सुटलेला आहे. मागासवर्गीय कल्याणासाठी जे बजेट ठेवलेले आहे त्याला कट लागू नये यासाठी महापालिका स्तरावर आम्ही परिपत्रक काढले असून, त्यामध्ये इतर बजेटमध्ये जरी कट लागला तरी मागासवर्गीय कल्याणासाठी जो निधी ठेवण्यात आला आहे तो प्राधान्याने देऊन कामे सुरू ठेवण्यात यावीत, असे नमूद केले आहे, असे सांगितले.

समितीने पुढील दोन महिन्यांमध्ये महानगरपालिकेमध्ये साडे तीन कोटी रुपयांची कामे सुरू करून समितीला तसा अहवाल सादर करावा, यामध्ये सन २०१६-१७ व २०१७-१८ च्या कामांचे संपूर्ण नियोजन करण्यात यावे, असे निदेश दिले. तसेच पुढील दोन महिन्यात याबाबतची कार्यवाही करण्यात यावी कारण हे करणे जास्त अवघड नाही. तुम्हाला कॉन्ट्रॅक्टर मिळत नसतील तर सोसायटीच्या माध्यमातून कामे देऊन पूर्ण करून घेण्यात यावीत, असे सुचविले. यावर आयुक्तांनी याबाबतची कामे करून घेण्यात येतील. तसेच ही कामे दलित वस्तीमध्येच होतील याचीही दक्षता घेण्यात येईल, असे आश्वासन दिले.

समितीने महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या प्राथमिक शिक्षण मंडळाकडील आकृतीबंध विहित मुदतीत राज्य शासनाच्या मागासवर्गीय कक्षाकडे पाठविण्यात आला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता आयुक्तांनी मुख्याध्यापक व पर्यवेक्षक संवर्गाचे रोष्टर मागासवर्गीय कक्षाकडून तपासून घेतले असून उर्वरित सर्व संवर्गाचे रोष्टर तयार करून मागासवर्गीय कक्षाला कळविले आहे. मागासवर्गीय कक्षाकडून दिनांक २६ मे २०१७ ही तारीख कळविण्यात आली आहे. मुख्याध्यापक व पर्यवेक्षक पदाचे रोष्टर तपासून झाले आहे. उर्वरित संवर्गाचे रोष्टर तपासण्यासाठी २६ मे ही तारीख देण्यात आली आहे. अशी माहिती दिली.

समितीने अनुसूचित जाती व जमातीच्या लघु उद्योजकांसाठी महानगरपालिकेच्या अखत्यारितील ५ टक्के दुकाने/स्टॉल्सचा लिलाव केवळ याच वर्गातील लोकांमधून बोली लावून आरक्षित करण्याबाबत शासन निर्णय झाला आहे काय तसेच ब्लड रिलेशनमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध असेल तर

इतर कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही असे मंत्री महोदयांनी सभागृहात जाहीर केले होते. त्या संदर्भातील जीआर काढण्यात आला आहे काय? मंत्री महोदयांनी ८ दिवसांत जीआर काढण्याबाबत विधानसभेत व विधानपरिषदेत आश्वासित केले होते. त्या अनुषंगाने जीआर काढण्यात आला तर सुलभ होईल, असे नमूद केले असता. सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी असे नमूद केले की, मंत्री महोदयांनी सभागृहाला आश्वासित केले असेल तर त्या अनुषंगाने शासन निर्णय काढण्याची प्रक्रिया आम्ही सुरू करू.

समितीने त्या दृष्टीने आपण संदर्भासाठी सभागृहाच्या कार्यवाहीतील भाग उपलब्ध करून घ्या. जीआर इश्यू झाला तर भविष्यकाळातील शाळा, महाविद्यालयातील प्रवेशांबाबत व सरकारी नोकरीतील पदोन्नतीबाबत खूप मदत होऊ शकेल, असे सूचित केले असता सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी त्यास होकार दिला.

समितीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त माणंगाव येथील स्मारकाकरिता व तेथील विकास कामांकरिता सन २०१६-१७ या वर्षाकरिता किती निधी प्राप्त झाला आहे? ४.९९ कोटी रुपयांचे बजेट असताना २ कोटी रुपये निधी का वितरित केला? सामाजिक न्याय विभागाकडे निधी उपलब्ध आहे, तुम्हीच मंजुरी द्यायची आहे. वित्त विभागाचा संबंध येत नाही. असे सूचविले असता सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी हातकणंगले तालुक्यातील माणंगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांचे स्मारक होण्यासाठी ४.९९ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मंत्री महोदय, सामाजिक न्याय यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली, त्या बैठकीमध्ये ठरल्यानुसार २४ मार्च २०१७ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे या कामासाठी २ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. हा २ कोटी रुपयांचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित केला आहे. एकूण २८ कामांसाठी ३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. या शिवाय या कामांवर अधिक निधी प्राप्त करण्यासाठीची नस्ती वित्त विभागाकडे सादर केली आहे. ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून २ कोटी रुपये दिलेले आहेत. ५ कोटी रुपयांच्या प्रशासकीय मान्यतेची फाईल सार्वजनिक बांधकाम विभागाला सादर केली आहे. आराखड्याला मान्यता मिळाली की उर्वरित रक्कम वितरित करु. दिनांक २४ मार्च २०१७ रोजीच्या जीआरप्रमाणे २८ कामांसाठी ३०.२१ कोटी रुपयांचा निधी विभागाने मंजूर केला आहे. या कामासाठी २ कोटी रुपयांचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित केलेला आहे, अशी माहिती दिली.

**अभिप्राय व शिफारस :**

समितीने कोल्हापूर महानगरपालिकेस दिलेल्या भेटीच्या वेळी व विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी सदर महानगरपालिका प्रशासनाने सन २००९ पासून बिंदूनामावलीचे रोष्टर संबंधित सहाय्यक आयुक्त,

(मागासवर्ग कक्ष) यांचे कार्यालयाकडून तपासून घेतलेले नसल्यामुळे अनुसूचित जातीच्या वर्ग 'अ' ते 'ड' मधील ८५ पदांचा अनुशेष पाच वर्षांपर्यंत भरला गेला नाही. त्यामुळे अनुसूचित जातीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **शासनाने महानगरपालिकेच्या या निष्काळजीपणाबाबत जे अधिकारी व कर्मचारी जबाबदार असतील त्यांना कारणे दाखवा (शो-कॉज) नोटीस देऊन त्यांचेवर उचित कार्यवाही करून त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**पोलीस अधीक्षक कार्यालय :**

समितीने वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे ही स्टेट लेव्हलवर भरण्यात येतात. आपल्या स्तरावरून वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरली जातात. त्यामुळे वर्ग-३ व वर्ग-४ या पदांचा आतापर्यंत बॅक लॉग किती आहे. तसेच तांत्रिक व अतांत्रिक पदे सरळ सेवा भरतीद्वारे भरण्यासाठी अवलंबिण्यात येत असलेल्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती देण्यात यावी, अशी विचारणा केली असता, पोलीस अधीक्षकांनी तांत्रिक व अतांत्रिक या पद्धतीची पदे आहेत. तांत्रिक पदांमध्ये मोटार ट्रान्सपोर्ट सेक्शन असून यामध्ये मेकॅनिक, फिटर ही पदे आहेत. तसेच वायरलेस ही पदे आयजीएलपी, पुणे येथून नियंत्रित केली जातात, असे सांगितले.

समितीने दर ३ वर्षांनी बिंदू नामावली (रोष्टर) तपासणे आवश्यक आहे. यासंदर्भात येथून पुढे काळजी घेण्यात येऊन रोष्टर लवकरात लवकर तपासण्यात यावे. रोष्टर तपासण्यास साधारणतः किती दिवस लागतील, अशी विचारणा केली असता, पोलीस अधीक्षकांनी रोष्टर तपासण्याची प्रक्रिया १५ दिवसात पूर्ण होईल, असे आश्वासन दिले.

समितीने अॅट्रॉसिटीच्या प्रलंबित असलेल्या १२ प्रकरणांची सद्य:स्थिती काय आहे व एका वर्षामध्ये झालेल्या केसेसमध्ये किती जणांना शिक्षा झाली, किती निर्दोष सुटले. खऱ्या अर्थाने त्या लोकांना न्याय मिळाला आहे काय? असे विचारले असता, पोलीस अधीक्षकांनी चार्जशिट पुटअप करण्याची ६० दिवसांची मर्यादा आहे. यातील ११ प्रकरणे ६० दिवसांच्या आतील आहेत. एका प्रकरणास ६० दिवसांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. ते प्रकरण तांत्रिक स्वरूपाचे आहे. इंडियन ऑईल कंपनीच्या हेड ऑफीसमधून कागदपत्रे मागविण्याकरिता पाठपुरावा सुरू आहे. ते लवकरात लवकर होईल. विहित मुदतीत म्हणजेच ६० दिवसांच्या आत प्रत्येक प्रकरणाचे दोषारोप पत्र दाखल करण्याची दक्षता घेऊन तशी कार्यवाही करतो. ५ केसेसमध्ये कनव्हीक्शन झालेले आहे. अॅट्रॉसीटीच्या केसेस लवकरात लवकर मार्गी लागून गुन्हेगारास तातडीने शिक्षा होण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यासाठी स्पेशल कोर्ट करून तेथे अॅडीशनल डिस्ट्रीक्ट जज यांची नियुक्ती करावी, अशी समितीने शिफारस करावी, अशी आमची विनंती आहे, असे नमूद केले.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

समितीने सद्यः स्थितीत ॲट्रॉसिटीचे दोन गुन्हे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत? असे विचारले असता पोलीस अधीक्षकांनी दिनांक १९ फेब्रुवारी २०१६ रोजी करवीर पोलीस स्टेशनमध्ये ॲट्रॉसिटीचा एक गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. हा गुन्हा दाखल होण्याचे कारण असे की, मी मागासवर्गीय आहे म्हणून माझ्या पेट्रोल पंपाचे नियम वेळोवेळी बदलत आहेत म्हणून त्या पेट्रोल पंप चालकाने इंधन आणि कार्पोरेशनच्या अधिकाऱ्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केलेला आहे. ज्या अधिकाऱ्याकडे हा तपास सुरू आहे त्या अधिकाऱ्याशी मी या गुन्ह्याच्या संदर्भामध्ये चर्चा केलेली आहे. या संदर्भातील सर्व कागदपत्राची तपासणी करून या तपासणीतून गुन्हा सिद्ध होत असेल तर या संदर्भामध्ये चार्ज शीट दाखल करण्यात येईल, असे सांगितले.

समितीने पाच फास्ट ट्रॅक कोर्ट महाराष्ट्र राज्यासाठीच आहेत काय? अशी विचारणा केली असता, गृह सचिवांनी होकार दिला व पाच फास्ट ट्रॅक कोर्ट व तीन विशेष न्यायालये हे महाराष्ट्रासाठी स्थापन करण्यात आलेले आहेत. गृह विभागाने विधी व न्याय विभागाकडे अशी मागणी केली आहे की, गृह विभागाला आणखी विशेष न्यायालयांची आवश्यकता आहे. एससी, एसटी समाजासाठी व ॲट्रॉसिटीच्या केसेस चालवण्यासाठी या कोर्टाची स्थापना करणे आवश्यक आहे. मागील वर्षी शासनाने असा निर्णय घेतलेला आहे की, प्रत्येक जिल्ह्यामधील तालुक्यामध्ये असलेल्या अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयांना स्पेशल कोर्ट म्हणून पॉवर दिलेली आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हास्तरावरील कोर्टास स्पेशल कोर्ट म्हणून या केसेस चालवण्यासाठी उपलब्ध होतील. शासनाचा जीआर आहे की, प्रत्येक विभागाच्या ठिकाणी विशेष न्यायालयामध्ये फक्त ॲट्रॉसिटीच्या केसेस चालतील. त्यातील औरंगाबाद, नागपूर व ठाणे या तीन विभागांमध्ये कोर्ट सुरू झालेले आहे. आणखी तीन ठिकाणी कोर्ट सुरू करावयाचे आहे. ज्या जिल्ह्यामध्ये जास्त केसेस दाखल होतात त्या जिल्ह्यामध्ये प्रथम एक्सक्ल्युझीव्ह कोर्टाची स्थापना करून टप्याटप्याने प्रत्येक जिल्ह्यामध्ये ही योजना लागू होईल, असे सांगितले.

## परिशिष्ट - एक

**कोल्हापूर महानगरपालिका यांचेकडून समितीला प्राप्त झालेली माहिती**

## कोल्हापूर महानगरपालिका

विषय : - महानगरपालिका सेवेतील नोकर भरती व बढती संबंधी धोरण ठरविणेबाबत.

संदर्भ :- १. श्री. सह.सहाय्यक आयुक्त, मुख्य लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक व
कामगार अधिकारी यांनी सादर केलेला.
दिनांक १८-४-१९७६ चा प्रस्ताव

प्रशासक ठराव क्रं.२७५/२३/६/७६

महापालिकेचे सेवेत शैक्षणीक पात्रतेनुसार कोणत्या पदापर्यंत पदोन्नतीस वाव असावा, ह.पा.पास असलेल्या सिनियर नोकरांच्या पदोन्नतीचा प्रश्न नोकर भरतीचे प्रमाण ह्या बाबीचा फेरविचार करण्याचा प्रस्ताव उप-आयुक्त, सह सहाय्यक आयुक्त, मुख्य लेखापरिक्षक व कामगार अधिकारी यांनी संयुक्तपणे सादर केला आहे. रेग्युलेशन नं.१ मधिल वरिल बाबी संबंधी तरतुदी अधिक स्पष्ट व सुसंगत करणेबाबत त्यांनी केलेल्या शिफारशी योग्य वाटतात. सबब खालील प्रस्तावास मंजुरी देणेत येत आहे.

१) नोकर ज्या केडरमध्ये प्रथम भरती (Dorect Recriot) होईल त्याची त्या केडरमध्ये इतरपात्रतेबरोबर किमान सात वर्षे सेवा झाल्या शिवाय तो पदोन्नतीस पात्र ठरणार नाही.

२) पदोन्नतीच्या इतर प्रकरणात अन्य पात्रतेबरोबर पदोन्नतीसा पात्र असले लगतचे खालील केडरमध्ये किमान पाच वर्षे सेवा झाल्याशिवाय कोणताही नोकर पदोन्नतीस पात्र ठरणार नाही.

इतर पात्रता म्हणजें (समाधानकारक सर्विस रेकॉर्ड, केडर मधील आवश्यकतो नोकरीचा कॉल अनुभव इत्यादी)

३) पदवीधर नोकर सुपरिटेंडेंटच्या वरील केडरच्या जागेवर पदोन्नतीस पात्र राहील

४) मॅट्रिक, एस.एस.सी.आयवा तत्सम परिक्षा पास असलेला नोकर सुपरिटेंडेंटच्या केडरपर्यंतच्या जागेवर पदोन्नतीस पात्र राहील.

५) नियत मंजूर तारखेस सिनियर क्लार्क, क्लार्क व मुकादम कम क्लार्कचे जागेवर पी.एस.सी. पास असलेले जे नोकर काम करीत आहेत. त्यांची झालेली सेवा विचारात घेवून त्यांना लगतच्या वरच्या जागी एकच बढती मिळण्यास ते पात्र राहतील.

६) नोकर भरती (Dorect Recriot) खालील प्रमाणे असावी.

अ) क्लार्क् - ५० टक्के

ब) शिपाई - ५० टक्के

क) कामगार - सर्व.

ही भरती करताना मागासवर्गीयांसाठी असलेल्या राखीव आरक्षणांच्या टक्केवारी प्रमाणे उमेदवार घेणेत यावेत.

## कोल्हापूर महानगरपालिका

विषय : - महानगरपालिका सेवेतील नोकर भरती व बढती संबंधी धोरण ठरविणेबाबत..

संदर्भ :- १. श्री. सह.सहाय्यक आयुक्त, मुख्य लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक व कामगार अधिकारी यांनी सादर केलेला. दिनांक १८-४-१९७६ चा प्रस्ताव

प्रशासक ठराव क्र.२७५/२३/६/७६

महापालिकेचे सेवेत शैक्षणीक पात्रतेनुसार कोणत्या पदापर्यंत पदोन्नतीस वाव असावा, व्ह.फा.पास असलेल्या सिनियर नोकरांच्या पदोन्नतीचा प्रश्न नोकर भरतीचे प्रमाण ह्या बाबीचा फेरविचार करण्याचा प्रस्ताव उप-आयुक्त, सह सहाय्यक आयुक्त, मुख्य लेखापरिक्षक व कामगार अधिकारी यांनी संयुक्तपणे सादर केला आहे. रेग्युलेशन नं.१ मधिल वरिल बाबी संबंधी तरतुदी अधिक स्पष्ट व सुसंगत करणेबाबत त्यांनी केलेल्या शिफारशी योग्य वाटतात. सबब खालील प्रस्तावास मंजुरी देणेत येत आहे.

१) नोकर ज्या केडरमध्ये प्रथम भरती (Dorect Recriot) होईल त्याची त्या केडरमध्ये इतरपात्रतेबरोबर किमान सात वर्षे सेवा झाल्या शिवाय तो पदोन्नतीस पात्र ठरणार नाही.

२) पदोन्नतीच्या इतर प्रकरणात अन्य पात्रतेबरोबर पदोन्नतीसा पात्र असले लगतचे खालील केडरमध्ये किमान पाच वर्षे सेवा झाल्याशिवाय कोणताही नोकर पदोन्नतीस पात्र ठरणार नाही.

इतर पात्रता म्हणजें (समाधानकारक सर्विस रेकॉर्ड, केडर मधील आवश्यकतो नोकरीचा कॉल अनुभव इत्यादी)

३) पदवीधर नोकर सुपरिटेंडेंटच्या वरील केडरच्या जागेवर पदोन्नतीस पात्र राहील

४) मॅट्रिक, एस.एस.सी.आथवा तत्सम परिक्षा पास असलेला नोकर सुपरिटेंडेंटच्या केडरपर्यतच्या जागेवर पदोन्नतीस पात्र राहील.

५) नियम मंजूर तारखेस सिनियर क्लार्क, क्लार्क व मुकामद_दम क्लार्कचे जागेवर पी.एस.सी. पास असलेले जे नोकर काम करीत आहेत. त्यांची झालेली सेवा विचारात घेवून त्यांना लगतच्या वरच्या जागी एकच बढती मिळण्यास ते पात्र राहतील.

६) नोकर भरती (Dorect Recriot) खालील प्रमाणे असावी.

अ) क्लार्कस् - ५० टक्के

ब) शिपाई - ५० टक्के

क) कामगार - सर्व.

ही भरती करताना मागासवर्गीयांसाठी असलेल्या राखीव जागांच्या टक्केवारी प्रमाणे उमेदवार घेणेत यावेत.

७) कामगार संघटनाशी यापूर्वी जे करार झालेले आहेत. त्या करारास अनुसरुन आरोग्य खातेकडील भंगी व झाडू कामगार मधून प्रत्येकी २५ टक्के जागा आवशकती शैक्षणीक पात्रता, सर्व्हीस रेकॉर्ड, नोकरीचा काल अनुभव आदीची पात्रता विचारात घेऊन कामगारामधून बढती देवून भरण्यात याव्यात (प्रथःत शिपाई अथवा मुकादम त्यानंतर क्लार्क या प्रमाणे बढती)

८) क्लार्कच्या जागेसाठी आवश्यक असणारी शैक्षणीक पात्रता आदीगोष्टी विचारात घेऊन निवड समितीकडून जी यादी केली जाईल त्यामधुन रेकॉर्डकडे उमेदवार पेणेत येऊन जरुरीप्रमाणे या उदमेदवारांमधून क्लार्कच्या जागा भरणेत याव्यात. सद्या रेकॉर्डकडे जे उमेदवार आहेत त्यांना निवडसमितीपुढे मुलाखतीसाठी बोलावुन त्यामध्ये उत्तीर्ण होणा-या उमेदवारासच रेकॉर्डकडे ठेवणेत यावे.

९) प.व.डी.कडील मिस्त्री व मुकादमचे जागेचे कामाच स्वरुप व जागेची संख्या विचारात घेता बढतीसाठी १० वर्षाची सेवेची अट असावी.

१०) पी.एस.सी.परिक्षा बंद झालेने मुकादम कम क्लार्कचे व प.व.मुकादमाचे जागेसाठी किमान आठवी पास अशी शैक्षणीक पात्रता असावी. पी.एस.सी.अथवा १० पास मुकादमास प.व.मेस्त्रीचे जागी बढतीसाठी पात्र समजणेत यावे.

११) अ.नं.२ व ९ या नियमात नमूद केले प्रमाणे किमान ५ व १० वर्षे सेवाकाल झालेला नोकर लगत खालच्या केडरमध्ये नसेल तर जरुत प्रसंगी व्यक्तीगत पात्र नोकरांचे बाबतीत सेवा कालाची अट महानगरपालिकेच्या मंजूरीने शिथिल करुन बढती देता येईल.

१२) पदोन्नतीचा क्रम खालीलप्रमाणे राहील.

अ) कामगार व शिपाई मधून मुकादम कम क्लार्क
ब) मुकादम कम क्लार्क मधून जुनियर क्लार्क
क) जुनियर क्लार्क मधून सिनियर क्लार्क
ड) सिनियर क्लार्क मधून असि.सुपरिटेंडेंट
इ) असि.सुपरिटेंडेंट मधून सुपरिटेंडेंट
ई) सुपरिटेंडेंट मधून पुढील क्रमाणे येणारे जागेवर पदोन्नती

१३) प.वर्क्स पदोन्नतीचा क्रम

अ) कामगारमधून मुकादम
ब) मुकादमामधून मेस्त्री

सही मराठी
प्रशासक,
कोल्हापूर महानगरपालिका

# कोल्हापूर महानगरपालिका

विषय :- नोकरांच्या पदोन्नतीसाठी वयोमर्यादा ठरविणे बाबत..

संदर्भ :- (१) रेग्युलेशन नं.१ ता.१६-४-७४
(२) प्र.द.ठ.नं. २७५/२३/६/७६
(३) सरकारी ठराव नं.इरि.ॲन्ड पॉवर डिपा.नं.
ता.१९ डिसेंबर १९७०
...यक्त यांचा ता.२२/६/७६ चा अभिप्राय

...४अ, ३/७/७७

महानगरपालिकेच्या सेवेमध्ये शैक्षणीक पात्रतेनुसार कोणत्या ... प्रमतास वाव असावा तसेच जे नोकर सिनियर आहेत त्यांना पदोन्नती देणेची झालेस त्यांची लगतच्या केडरमध्ये किती वर्षे सर्व्हिस झाली पाहिजे या संबंधी धोरण ठरलेले आहे. रेग्युलेशन नं.१ मध्ये व प्र.द.ठ.नं.२७५/२३/६/७६ मध्ये पदोन्नती बावयाच्या नोकरांची ... केडरमध्ये नोकरी ५ वर्षे झाली पाहिजे असे बंधन आहे. परंतु शासनाच्या इरिगेशन ॲन्ड पॉवर डिपॉर्टमेंट कडील ठ.नं.जी.ए.डी.-१०७० ई (आय) ता.१९१२/७० ने ज्युनियर इंजिनिअरना ...चे वरील केडरमध्ये पदोन्नती देणेची झाल्यास फक्त ३ वर्षे सेवेच्या अनुभवाचे बंधन आहे. महापालिकेमध्ये पदोन्नतीसाठी जे ५ वर्षांचे बंधन ठेवले आहे त्यामुळे बहुतांशी नोकर ... सा पात्र ठरत नाहीत तेंव्हा पदोन्नतीसाठी ठेवलेने ५ वर्षाची मर्यादा सिथील करावी म्हणून कामगार संघटनेकडून वारंवार मागणीही येते तेंव्हा रेग्युलेशन नं.१/१...७४/७४ ... शासक दप्तरी ठराव नं.२७५/२३/०६/७६ मधील अनु.नं.२ व ९ ला दुरुस्ती करणेत यावी वगैरे म्हणून श्री.उप-आयुक्त यांची ता.२२/६/७७ ची शिफारस अली

...युक्त यांचे आले ...रशीस अनुसरू ...लेशन नं.१/१६/४/७४ व प्र.द.ठ.नं.२७५/२३/६/७६ मधील अनु.नं.२ व ९ ला खालील प्रमाणे दुरुस्ती करावी.

...न्नतीसाठी इतर अन्य पात्रतेबरोबर पदोन्नतीस पात्र ...लले लगतचे खालील केडरमध्ये किमान तीन वर्षांची सेवा झाल्याशिवाय कोणताही नोकर पदोन्नतीस पात्र ठरणार नाही.

२) प.व.डी.कडील मेस्त्री व मुकादमाचे आधेचे स्वरुप व जागांची संख्या विचारात घेता बढतीसाठी सेवेची मुदत ५ वर्षाची असावी

३) डायरेक्ट रिक्रुटबद्दल प्रमोशनसाठी सात वर्षे ऐवजी ५ वर्षांची कमीत कमी अट असावी.

येणे प्रमाणे दुरुस्ती करुन या शिवाय शैक्षणीक ... संबंधली इतर अटी आहेत, त्यापूर्वी प्रमाणेच रहाणेच्या आहेत.

सही मराठी
डी.टी.जोसेफ ४/७/७९
प्रशासन
कोल्हापूर महानगरपालिका

# कोल्हापूर महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय

महापालिका ठराव क्रमांक १६७

सभा क्रमांक ३३ — दिनांक १९/९/८७

विषय क्रमांक - ३८

विषय:- कोल्हापूर महानगरपालिकेकडे मुंबई प्रा.म.न.पा.अधि.१९४९ चे ४६५/अ खाली नोकरांची भरती करणेबाबत

संदर्भ :- १. मा.स्थायी समिती ठराव क्र.३२६/१६/९/८७ ने आलेली शिफारस

कोल्हापूर महानगरपालिकेकडे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधि.१९४९ चे कलम ४६५/अ खाली नोकरांचे भरती करणे संबंधी जे विनिमय करणेत आलेले आहेत. त्यांतील कनिष्ठ लिपीक भरती करणेकरीता खालील प्रमाणे जे विनिमय करणेत आलेले आहेत. त्या विनिमयांना मंजूरी द्यावी म्हणून स्थायी समिती ठ.क्रं.३२६/१६.९.८७ ने आलेली शिफारस समोर निवेदन केली.

कनिष्ठ लिपीक :-

अ - नामनिर्देशन १) वयोमर्यादा : - उमेदवारांचे वय पदासाठी ज्या दिवशी अर्ज येईल अगर सेवानियोजन कार्यालयाकडून उमेदवारांची नावे येईल त्यादिवशीच्या तारखेस त्याचे वय २८ वर्षांपेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयसाठी वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२) शैक्षणिक अर्हता :-

१) मॅट्रीक या एस.एस.सी.परिक्षा इंग्रजी विषयासह पास/मराठी टायपिंग परिक्षा पास

२) एल.एस.जी.डी.ची परिक्षा पास

परंतु निवडीच्यावेळी जर टायपिंग परीक्षा पास असणारा व एल.एस.जी.डी.परिक्षा पास असणार उमेदवार उपलब्ध न झालेस अशावेळी नियुक्त केले उमेदवाराने एक वर्षाच्या आत या दोन्ही शैक्षणिक पात्रता प्राप्त करणेच्या आहेत.

३) महानगरपालिकेच्या कार्यालयात ॲप्रेन्टीस ॲक्टनुसार ॲप्रेन्टीस म्हणून काम केलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

ब) पदोन्नतीसाठी

१) मॅट्रीक अथवा एस.एस.सी.परिक्षा पास इंग्रजी विषयासह
२) मुकादम व मुकादम कम क्लार्क या संवर्गास ५ वर्ष सेवा व जेष्ठता
३) चतुर्थ श्रेणीतील शिपाई कामगार संवर्गात ७ वर्ष सेवा
४) रेकॉर्ड खाते उमेदवार म्हणून सलग ३ वर्ष सेवा, लायक व जेष्ठ
५) विनियम ५ प्रमाणे ७५ टक्के जागा भरताना खालील टक्केवारीनुसार भरणेच्या आहेत.

१) मुकादम २० टक्के
२) कायम झाडू व भंगी कामगार २० टक्के
३) शिपाई व प.व.डी.कामगार २० टक्के
४) रेकॉर्ड उमेदवार १५ टक्के

वरील प्रमाणे कनिष्ठ लिपीक भरती संदर्भात करणेत आलेल्या विनिमियास मंजूरी देणेत येवून याप्रमाणे पूर्वीच्या नियमात दुरुस्ती करणेत यावी.

सुचक : मा.गौ.स.जाधव
अनुमोदक : मा.ना.ग.पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

सही इंग्रजी
महापौर,
कोल्हापूर महानगरपालिका

प्रत माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी
१. मा.आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका
२. कामगार अधिकारी (मूळ कागासह)

सही इंग्रजी
नगरसचिव,
कोल्हापूर महानगरपालिका

परिशिष्ट:- ०२

वर्ग अ ते वर्ग ड मधील मंजूर पदसंख्या, अनुसुचित जातीच्या वर्षनिहाय भरणेत आलेल्या पदांचा तपशिल

| | | मंजूर पदे | | | (तांत्रिक व अतांत्रिक) वर्षनिहाय भरणेत आलेली एकूणपदे (सरळसेवा + पदोन्नती) | | | | (तांत्रिक व अतांत्रिक) मंजूर पदांपैकी अनु. जातीच्या उमेदवारांसाठी राखीव पदे | | | अनुसुचित जातीच्या उमेदवारांकरिता राखीव ठेवण्यात आलेल्या पदांपैकी भरलेली पदे (सरळसेवा + पदोन्नती) | | | | मंजूर पदांपैकी अनु. जातीच्या पदांवर कार्यरत कर्मचारी दि. ३१/०३/१६ अखेर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वर्ग | तांत्रिक | अतांत्रिक | एकूण | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | सरळसेवा | पदोन्नती | एकूण |
| १ | अ | ९ | ७ | १६ | ० | १ | २ | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | १ |
| २ | ब | १५० | ३२ | १८२ | २ | ३ | ४ | १० | १७ | ३ | २० | ० | ० | ० | २ | १२ | ३ | १५ |
| ३ | क | ४५२ | ३४३ | ७९ | ० | १ | ३४ | ७ | ६९ | ४१ | ११० | ० | ० | ६ | २ | ४७ | २३ | ७० |
| ४ | ड | ३७२ | ३३०९ | [illegible] | १६१ | ९५ | १८५ | २०२ | २५२ | ४० | २९२ | ११२ | ९४ | ४४ | १२८ | १९०६ | ४६ | १९५२ |
| एकूण | | ९८३ | [illegible] | ४६७४ | १६३ | १०० | २२५ | २१९ | ३३८ | ८५ | ४२३ | ११२ | ९४ | ५१ | १३२ | १९६५ | ७३ | २०३८ |

अतांत्रिक पदे

| | | | | अतांत्रिक मंजूर पदे | वर्षनिहाय भरणेत आलेली एकूणपदे (सरळसेवा + पदोन्नती) | | | | मंजूर पदांपैकी अनु. जातीच्या उमेदवारांसाठी राखीव पदे | | | अनुसुचित जातीच्या उमेदवारांकरिता राखीव ठेवण्यात आलेल्या पदांपैकी भरलेली पदे (सरळसेवा + पदोन्नती) | | | | मंजूर पदांपैकी अनु. जातीच्या पदांवर कार्यरत कर्मचारी दि. ३१/०३/१६ अखेर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वर्ग | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | सरळसेवा | पदोन्नती | एकूण |
| १ | अ | ६ | १ | ७ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | ब | ११ | २१ | ३२ | ० | २ | २ | १० | १ | २ | ३ | ० | ० | ० | २ | ० | २ | २ |
| ३ | क | ८७ | २५६ | ३४३ | ० | १ | ३१ | ५ | १२ | ३३ | ४५ | ० | ० | ६ | १ | ४ | २० | २४ |
| ४ | ड | ३१३८ | १७१ | ३३०९ | १६१ | ९५ | १८५ | १९४ | १६० | २४ | १८४ | ११२ | ९४ | ४४ | १२८ | १८८३ | ३७ | १९२० |
| एकूण | | | | ३६९१ | १६१ | ९८ | २१९ | २०९ | १७३ | ५९ | २३२ | ११२ | ९४ | ५० | १३१ | १८८७ | ५९ | १९४६ |

तांत्रिक पदे

| | | | | तांत्रिक मंजूर पदे | वर्षनिहाय भरणेत आलेली एकूणपदे (सरळसेवा + पदोन्नती) | | | | मंजूर पदांपैकी अनु. जातीच्या उमेदवारांसाठी राखीव पदे | | | अनुसुचित जातीच्या उमेदवारांकरिता राखीव ठेवण्यात आलेल्या पदांपैकी भरलेली पदे (सरळसेवा + पदोन्नती) | | | | मंजूर पदांपैकी अनु. जातीच्या पदांवर कार्यरत कर्मचारी दि. ३१/०३/१६ अखेर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वर्ग | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | सरळसेवा | पदोन्नती | एकूण |
| १ | अ | ३ | ६ | ९ | ० | १ | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | १ |
| २ | ब | ११७ | ३३ | १५० | २ | १ | २ | ० | १६ | १ | १७ | ० | ० | ० | ० | १२ | १ | १३ |
| ३ | क | ३९७ | ५५ | ४५२ | ० | ० | ३ | २ | ५७ | ८ | ६५ | ० | ० | ० | १ | ४३ | ३ | ४६ |
| ४ | ड | २६३ | १०९ | ३७२ | ० | ० | ० | ८ | ९२ | १६ | १०८ | ० | ० | ० | ० | २३ | ९ | ३२ |
| एकूण | | | | ९८३ | २ | २ | ६ | १० | १६५ | २६ | १९१ | ० | ० | १ | १ | ७८ | १४ | ९२ |

K. M. C. कोल्हापूर

परिशिष्ट:- ३

अनुसुचित जाती प्रवर्गासाठी सरळसेवा व पदोन्नती रिक्त असणाऱ्या पदाचे विवरणपत्र

तांत्रिक पदे

| अ.क्र. | संवर्ग/पदनाम | मंजूर पदे | | | सरळसेवा | | | | | | पदोन्नती | | | | | | सरळसेवा + पदोन्नती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | सरळसेवा मंजूर पदे | एकूण कार्यरत | एकूण रिक्त | पैकी अजा आरक्षण | अजा कार्यरत | अजा रिक्त | पदोन्नती मंजूर पदे | एकूण कार्यरत | एकूण रिक्त | पैकी अजा आरक्षण | अजा कार्यरत | अजा रिक्त | मंजूर पदे | एकूण कार्यरत | एकूण रिक्त | पैकी अजा आरक्षण | अजा कार्यरत | अजा रिक्त |
| वर्ग अ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | उपनगर अभियंता | ० | ३ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | १ | २ | १ | १ | ० | ३ | १ | २ | १ | १ | ० |
| एकूण | | ० | ३ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | १ | २ | १ | १ | ० | ३ | १ | ३ | १ | १ | ० |
| वर्ग ब | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | वैद्यकिय अधिकारी | ५८ | ० | ५८ | ५८ | २९ | २९ | ८ | ५ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ५८ | २९ | २९ | ८ | ५ | ३ |
| २ | मिश्र.आरोग्य निरिक्षक | १ | २ | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | १ | ० | १ | ३ | २ | १ | १ | ० | १ |
| ३ | सहा.अभियंता | २ | ५ | ७ | २ | २ | ० | १ | १ | ० | ५ | ० | ० | ० | ० | ० | ७ | २ | ० | १ | १ | ० |
| ४ | कनिष्ठ अभियंता | ४१ | ० | ४१ | ४१ | ३१ | १० | ५ | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४१ | ३१ | १० | ५ | ५ | ० |
| ५ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | २ | ० | २ | २ | १ | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | १ | १ | ० |
| ६ | सिस्टर | ५ | १५ | २० | ५ | २ | ३ | १ | ० | १ | १५ | ० | ० | ० | ० | ० | २० | २ | ३ | १ | ० | १ |
| एकूण :- | | १०९ | २२ | १३१ | १०९ | ६६ | ४३ | १६ | १२ | ४ | २२ | १ | १ | १ | ० | १ | १३१ | ६७ | ४४ | १७ | १२ | ५ |
| वर्ग क | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | कनिष्ठ टंकलेखक | ४ | ० | ४ | ४ | ३ | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ३ | १ | १ | ० | १ |
| २ | आरोग्य निरिक्षक | १६ | ० | १६ | १६ | ३ | १३ | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १६ | ३ | १३ | २ | १ | १ |
| ३ | नर्स (बी.पी.एन.ए.) | ७३ | ० | ७३ | ७३ | ३० | ४३ | १० | ५ | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ७३ | ३० | ४३ | १० | ५ | ५ |
| ४ | नर्स (ए.एन.एम.) | २३ | ० | २३ | २३ | ७ | १६ | ३ | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २३ | ७ | १६ | ३ | १ | २ |
| ५ | मिडवाईफ | ५ | ० | ५ | ५ | २ | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ | २ | ३ | १ | १ | ० |
| ६ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ८ | ० | ८ | ८ | ५ | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ८ | ५ | ३ | १ | १ | ० |
| ७ | क्ष-किरण तंत्रज्ञ | २ | ० | २ | २ | २ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ | ० | १ | ० | १ |
| ८ | वरिष्ठ मिश्रक | १ | ४ | ५ | १ | ० | १ | ० | ० | ० | ४ | ० | ४ | १ | ० | १ | ५ | ० | ५ | १ | ० | १ |
| ९ | मिश्रक तथा लिपिक | २२ | ० | २२ | २२ | १२ | १० | ३ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २२ | १२ | १० | ३ | ३ | ० |
| १० | सहा.आरोग्य निरिक्षक | ४ | ११ | १५ | ४ | २ | २ | १ | १ | ० | ११ | ० | ११ | २ | ० | २ | १५ | २ | १३ | ३ | १ | २ |
| ११ | सहाय्यक बाग अधिक्षक | २ | ० | २ | २ | ० | २ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | २ | १ | ० | १ |
| १२ | आरेखक | २ | ६ | ८ | २ | ० | १ | १ | ० | ० | ६ | १ | ५ | १ | ० | १ | ८ | १ | ६ | २ | ० | १ |
| १३ | भुमापक | ९ | ० | ९ | ९ | ५ | ४ | १ | ३ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ९ | ५ | ४ | १ | ३ | २ |
| १४ | रेखक | ७ | ० | ७ | ७ | ४ | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७ | ४ | ३ | १ | १ | ० |
| १५ | पंप ऑपरेटर | १६ | ० | १६ | १६ | २ | १४ | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १६ | २ | १४ | २ | १ | १ |
| १६ | मेस्त्री | १ | ४ | ५ | १ | ० | १ | ० | ० | ० | ४ | ० | ४ | १ | ० | १ | ५ | ० | ५ | १ | ० | १ |
| १७ | विज तंत्री | ३ | ० | ३ | ३ | ० | ३ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ० | ३ | १ | ० | १ |
| १८ | टेलिफोन ऑपरेटर | ३ | ० | ३ | ३ | २ | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | २ | १ | १ | १ | ० |
| १९ | स्थानक अधिकारी | ३ | ० | ३ | ३ | २ | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | २ | १ | १ | १ | ० |
| २० | ऑटो इलेक्ट्रिशियन | १ | २ | ३ | १ | ० | १ | ० | ० | ० | २ | ० | २ | १ | ० | १ | ३ | ० | ३ | १ | ० | १ |
| २१ | वाहनचालक | १५३ | ० | १५३ | १५३ | ८४ | ६९ | २० | १७ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | १५३ | ८४ | ६९ | २० | १७ | ३ |

## तांत्रिक पदे

| अ.क्र. | संवर्ग/पदनाम | मंजूर पदे | | | सरळसेवा | | | | | | पदोन्नती | | | | | | सरळसेवा + पदोन्नती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | सरळसेवा मंजूर पदे | एकूण कार्यरत | एकूण रिक्त | पैकी अजा आरक्षण | अजा कार्यरत | अजा रिक्त | पदोन्नती मंजूर पदे | एकूण कार्यरत | एकूण रिक्त | पैकी अजा आरक्षण | अजा कार्यरत | अजा रिक्त | मंजूर पदे | एकूण कार्यरत | एकूण रिक्त | पैकी अजा आरक्षण | अजा कार्यरत | अजा रिक्त |
| २२ | हॉटमिक्स प्लँट ऑपरेटर कम फिटर | २ | ० | २ | २ | ० | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | २ | १ | ० | ० |
| २३ | सिनि.जिम्नॅशियम कोच कम क्लार्क | १ | ३ | ४ | १ | ० | १ | ० | ० | ० | ३ | १ | २ | १ | ० | १ | ४ | १ | ३ | १ | ० | १ |
| २४ | जिम्नॅशियम कोच कम क्लार्क | १ | ३ | ४ | १ | २ | ० | ० | २ | १ | ३ | २ | १ | १ | ० | १ | ४ | ४ | १ | १ | २ | २ |
| २५ | स्विमींग कोच कम क्लार्क | २ | ० | २ | २ | ० | २ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | २ | १ | ० | १ |
